दिवाळीचा मोठा अंक

REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख २ नोव्हेंबर, १९३८ | अंक ४३

शेड्युल्ड बँक होण्याच्या मार्गावर—निधिधारकांची स्वतःची बँक

## धि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लिमिटेड

हेड ऑफिसः—सर विठलदास चेंबर्स, अपॉलो इंपिरियल बँकेसमोर, फोर्ट, मुंबई.

अध्यक्षः—श्री. जमनादास एम. मेहता, एम. ए., एलएल. बी. मुंबई सरकारचे माजी अर्थमंत्री.

उपाध्यक्षः—श्री. ल. ब. भोपटकर, एम. ए., एलएल. बी. व्हॉईस प्रिन्सिपॉल, लॉ कॉलेज, पुणें.

डिपॉझिटर्स डायरेक्टरः—श्री. मेयर निसीम, एम. ए. जे. पी. डायरेक्टर, ओरिएंटल, विमा कं. लि.

**बँकेचें भरलेलें (PAID UP) भांडवल रु. २,५२, ०००।— (जवळ जवळ)**

ता. १ एप्रिल १९३८ ( काम सुरू करण्याचे दिवशीं ) रु. ८३, १६५।—

ता. २४ ऑगस्ट १९३८ ( स्टॅट्युटरी रिपोर्टाच्या दिवशीं ) रु. १,४४,८८७।—

ता. १ ऑक्टोबर १९३८ ... .... .... ... रु २,५१,८००।—

**आणखी अडीच लाख रुपयांचे शेअर्स घेऊन पहिली महाराष्ट्रीय**

## — शेड्युल्ड बँक होण्यास मदत करा —

**बँकेकडे आलेल्या ठेवी.**

भागीदारांनीं २४ सप्टेंबरच्या स्टॅट्युटरी सभेमध्यें स्वीकृत केलेल्या ता. २४।८।१९३८ च्या स्टॅट्युटरी रिपोर्टाप्रमाणें.

| चालू व सेव्हिंग बँक खातीं. | मुदतबंद ठेवी. | एकूण ठेवी. |
|---|---|---|
| रु. ४,३९, ५७३।— | रु. ७९, ७००।— | रु. ५,१९,२७३।— |

**ह्यापुढें बँकेचे धंद्याबाबतचे आकडे दर तिमाहीनें प्रसिद्ध केले जातील.**

— प्रतिनिधी पाहिजेत. —

महाराष्ट्रांतील सर्व प्रमुख ठिकाणीं बँकेस हुंडी-व्यवहारासाठीं व सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार करण्यासाठीं प्रतिनिधी नेमणें आहे. जुन्या पद्धतीनें सावकारी, सराफी, वगैरे धंदे करणारांनीं, आधुनिक पद्धतीनें चालविलेल्या बँकेशीं संलग्न होण्यासाठीं पत्रव्यवहार करावा अगर समक्ष भेटावें.

मध्यमवर्गाच्या गृहस्थांना व व्यापाऱ्यांना सर्व तऱ्हेच्या सवलती दिल्या जातील
सरकारी कर्जरोखे व शेअर्सची खरेदी-विक्री कसोशीनें केली जाईल.

चालू खातें:—द. सा द. शे. १% रु. १०० रुपयांपासून सुरू करतां येतें; सेव्हिंग बँक खातें:— द. सा. द. शे. २ ते २½% दहा रुपयांपासुन सुरू करतां येतें. सेव्हिंग बँक खात्यांतून रक्कम रु. १०००।— पर्यंत चेकनें काढतां येत. मुदत बंद ठेवी:—१ ते ५ वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर २½% पासून ४% पर्यंत. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. समक्ष भेटा अगर लिहा.


सी. एम. वारद,
चेअरमन लोकल कमिटी,
सोलापूर शाखा.

द. दा. देशपांडे,
बी. ए., एफ. सी. आर. ए. (ग्लासगो)
मॅ. डायरेक्टर.

# हेच दिवस गोवें बघण्याचे !

## महाराष्ट्रांतील अत्यंत रमणीय प्रदेशांत सहल करण्यास चला.

हिंदुस्थानभर पसरलेले कर्तृत्ववान दाक्षिणी सारस्वत त्यांची ही धर्मभूमि. त्यांचे पूर्वज इथले. त्यांच्या वसा, हतींचा, कलाविकासाची चिरंजीव साक्ष म्हणजे येथील देव व देवळें. रम्य वनश्री, उंच गोपुरें, विस्तृत अग्रशाळा, तलाव इत्यादि वैशिष्ट्यानें अत्यंत प्रेक्षणीय वाटणारीं हीं देवळें अनेक आहेत. मंगेशींचा श्री-मांगिरीश, कवळेंची शांतादुर्गा, रामनाथींचा रामनाथ-नागेशींचा नागेश, बांदिवड्याची महालक्ष्मी, म्हारडोळींची म्हाळसा, ह्या देवदेवता, त्यांचीं देवळें व त्याच्या आसमंतांतील सृष्टिसौंदर्य नितांत-रमणीय आहे.



श्रीमांगिरीश, मंगेश.



श्रीशांतादुर्गा कवळें.

गोमंतकांत रोमनकॅथॉलिक सांप्रदायी लोकांचीं देवळेंसुद्धां हिंदूंच्या देवळांइतकींच सुंदर व भव्य आहेत. त्यांतल्या त्यांत जुनें गोंयचीं ख्रिस्ती देवळें—जिथें सेंट फान्सिसचें शव आज शेंकडों वर्षे राखून ठेवलें आहे—तीं फारच दर्शनीय आहेत. प्रत्येकानें तीं पहावींत.

गोव्यांतील आरोग्यदायी ठिकाणामध्यें कळंगुट हा गांव फार प्रख्यात आहे. कळंगुटच्या विस्तीर्ण समुद्रकाठीं लांबलांबचे लोक समुद्रस्नान व हवाफेर करण्यासाठीं नेहमींच येत असून ते तेथें महिना महिना रहातही असतात. पणजीपासून अवघ्या दहा मैलांवर हें गांव असून स्टीमलॉंचीस व मोटरमधून तिथें एका तासाच्या आंत पोचतां येतें.



श्रीम्हाळसा, म्हारडोळ.

हिवाळ्याच्या दिवसांत महाराष्ट्रांतील हा नितांतरमणीय प्रदेश पाहण्यासाठीं गोमांतकांत चला. पावसाळा संपवून गोड थंडींत प्रवेश करणारा गोमंतक सृष्टि उत्साहानें तुमचें स्वागत करील. कुठेंही जा—सौंदर्याच्या अपूर्वतेनें तुमचें मन प्रसन्न होईल. तुम्हांला या प्रदेशांत नेण्यासाठीं मुंबईहून बी. एस. एन. कंपनीच्या दररोज अनेक बोटी सुरू असतात. बोटींवर जेवणखाणाची व उपाहाराची सुंदर व्यवस्था असून तुमच्या सोयी—गैरसोयींकडे दक्षतेनें लक्ष पुरविणारे कंपनीचे पॅसेंजर गाईड्स तुम्हांला नेहमीं मदत करण्यास तत्पर असतात.

**विशेष माहिती कंपनीच्या १०० फ्रिअर रोड, मुंबई येथील हेड ऑफिसवर पत्रानें अथवा २५०६१ नंबरवर टेलिफोननें चौकशी केली असतां मिळेल.**

# बी. एस. एन. कंपनी लि.

## जबाबदारीची जाणीव :

प्रत्येकाला असतेच.

तथापि

आपली जबाबदारी ओळखून त्याची तरतूद
केलेली असतेच असें नाहीं. कारण

दररोजच्या कामाच्या गडबडींत भविष्यकाळाचा विचार
करावयास वेळच मिळत नाहीं. तरी खालील
पत्त्यावर कळविल्यास योग्य तो सल्ला
ताबडतोब दिला जाईल.

मॅनेजिंग एजंट,

# दि ग्रेट सोशल लाइफ
ॲण्ड
# जनरल ॲशुअरन्स लि., जळगांव

### मुंबई प्रांतिक सहकारी बँक

मुंबई प्रांतिक सहकारी बँक ही मुंबई प्रांतांतील सहकारी बँकांच्या केंद्रीकरणाचें प्रमुख साधन आहे. ह्या नात्यानें तिच्यावर फार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे आणि ती जबाबदारी बँक आस्थापूर्वक पार पाडीत आहे हें तिच्या चालकांस भूषणावह आहे. तिची स्थापना १९११ सालीं मुंबई मध्यवर्ती सहकारी बँक ह्या नांवानें झाली, त्या वेळीं जिल्हा बँका अस्तित्वांत आलेल्या नव्हत्या. १९२३ सालीं तिनें सध्याचें नांव धारण केलें. ज्या ठिकाणीं जिल्हा बँका नाहींत अशा ठिकाणच्या प्राथमिक सहकारी सोसायट्यांस भांडवल पुरवणें आणि ज्या जिल्हा बँकांजवळ पुरेसें खेळतें भांडवल नसेल, त्यांस तें तात्पुरतें देणें, हें प्रांतिक सहकारी बँकेचें दुहेरी कार्य आहे. तिचें भरणा झालेलें भांडवल १२ लक्ष रुपये असून खेळतें भांडवल सुमारें २½ कोटि रुपये आहे. १९३६–३७ सालीं व्यक्तिशः १,१३७ व बँका आणि सोसायट्या मिळून १,८८० असे ३,०५३ सभासद तिचे पटावर होते. बँकेच्या शाखांची संख्या ३० आहे. ह्या संस्थेच्या कार्याचा व्याप किती प्रचंड आहे हें ह्या माहितीवरून दिसून येईल. १९३६–३७ सालीं तिच्या एकूण सुमारें २½ कोटि रुपये खेळत्या भांडवलापैकीं १ कोटि रुपये सोसायट्यांकडून व बँकांकडून येणें होतें. हाताशीं राहिलेली जादा रकम सरकारी रोख्यांत आणि व्यापारी बँकांकडील ठेवींत गुंतविण्यांत येते. बँकेची व्यवस्था १५ डायरेक्टरांच्या बोर्डाकडे असते. ह्यांपैकीं ७ लोकांची निवड व्यक्तिशः भागीदारांकडून केली जाते आणि उरलेल्या जागांवर मध्यवर्ती बँका, अर्बन बँका आणि प्राथमिक सोसायट्या ह्यांचे प्रतिनिधी निवडले जातात. प्रांतिक बँकेनें आपल्या शाखांमार्फत बँकिंगचा प्रसार खेडोपाडींहि चांगल्या तऱ्हेनें केला आहे आणि वजनदार, व्यवहारकुशल आणि दक्ष चालकांचें नेतृत्व तिला आजवर लाभलेलें आहे. मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हौसची प्रांतिक बँक ही सभासद आहे. श्री. वैकुंठराय मेहता हे बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

---

### दि ग्रेट सोशल लाइफ अँन्ड जनरल अॅशुअरन्स लि.

वरील विमा कंपनीच्या पुणें येथील ऑर्गनायझिंग ऑफिसचें उद्घाटन लक्ष्मीरोडवरील माणिक मोती मॅन्शनमध्यें ता. १ नोव्हेंबर रोजीं ना. एल. एम. पाटील ह्यांचे हस्तें झालें. ह्या समारंभाकरितां श्री. शंभूराव देसाई ( मॅनेजर ) आणि श्री. डी. जी. कुळकर्णी हे मुद्दाम जळगांवहून पुणें येथें आले होते. कंपनीचा व्यवहार वाढत असून त्यास अनुसरून कंपनीचें कार्यक्षेत्र पसरत आहे.

---

### दि भारत इन्डस्ट्रिअल बँक लि. पुणें

"दि भारत इन्डस्ट्रिअल बँक लि." या बँकेला बिझिनेस कमेन्समेंट सर्टिफिकेट मिळालें आहे. बँकेचे कामास शनिवार तारीख २९ ऑक्टोबर १९३८ ( घबाड षष्ठी ) कार्तिक शु. ६ या सुमुहूर्तावर सुरुवात झाली. तन्निमित्त त्या दिवशीं सकाळीं ८ ते सायंकाळीं ८ वाजेपर्यंत पानसुपारीचा समारंभ करण्यांत आला. बँकेचें १½ लक्ष रुपयांचें भांडवल खपलेलें आहे. श्री. के. व्ही. केळकर एम. ए., एलएल. बी., हे बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे अध्यक्ष असून श्री. आर. बी. साळवेकर आणि श्री. एन. एन. क्षीरसागर हे मॅनेजिंग डायरेक्टर्स आहेत.

---


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें

| | रु. |
|---|---|
| अधिकृत भांडवल | २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें | १३,७५,००० |
| खपलेलें भांडवल | १,२५,००० |

बँकेचे व्यवहारास तारीख २९–१०–३८ रोजीं सुरवात झाली आहे.

कामाची वेळ :
रोज सकाळीं ८ ते ६–३० सायंकाळीं
शनिवारीं „ ८ ते १ दुपारीं

## काल्टेक्स पेट्रोल

मोटारचें इंजन नीट चालवून, काजळी न धरतां दुसऱ्या पेट्रोलपेक्षा जास्त मैल गाडी नेतें.

## काल्टेक्स पेट्रोल

रानडे, जोग आणि सन्स,

डेक्कन जिमखाना पुणें.

वर्ष ४ अंक ४३ ] **अर्थ** [ २ नोव्हेंबर १९३८

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ५२० |
| २ लक्ष्मीपूजन ... | ५२१ |
| ३ हुंडणावळीस हात लावूं नका ! ... ... | ५२१ |
| ४ न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया ... ... | ५२२ |
| ५ स्फुट विचार | ५२३ |
| आमचा दिवाळी अंक—कारखान्यांतील तंट्यांबाबतचा कायदा—उज्जयनी येथें प्रो. काळे ह्यांचीं व्याख्यानें ... ... | |
| ६ बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट | ५२४ |
| ७ वेस्टर्न इंडिया कं. | ५२४ |
| ८ वर्ल्ड वाइड ॲशुअरन्स लि. | ५२४ |
| ९ सहकारी बँकांच्या घटनेंतील दोषस्थळें ... | ५२५ |
| १० खरा माल ओळखून वापरा | ५२७ |
| ११ पदवीधर माणसाचा उपक्रम ... ... | ५२९ |
| १२ बँकिंगच्या धंद्यांत आवश्यक गुण ... | ५३० |
| १३ सहकार संदेश ... | ५३२ |
| १४ रविवार पेठ सहकारी पतपेढी ... ... | ५३२ |
| १५ खेड व जुन्नर ता. को. सु. यूनियन ... | ५३२ |
| १६ पथिकाश्रमाची पूर्वपीठिका | ५३४ |
| १७ प्रेसिडेन्सी इं. बँक... | ५३७ |
| १८ डेक्कन पेपर मिल्स | ५३७ |
| १९ कॉमनवेल्थ अॅ. कं. | ५३७ |
| २० श्रीराम सिल्क थ्रोइंग फॅक्टरी ... ... | ५३८ |
| २१ आयुर्वेद रसशाळा | ५३८ |
| २२ ब्लॉसम मॅन्युफॅक्चरिंग कं. | ५३८ |
| २३ ट्रस्ट ऑफ इंडिया कं. | ५३८ |
| २४ बँक ऑफ महाराष्ट्र | ५३८ |
| २५ सारस्वत को. बँक | ५३८ |
| २६ पुणें जिल्हा लँड मॉर्गेज बँक - ... ... | ५३८ |
| २७ इंडियन प्रोग्रेसिव्ह कं. | ५३८ |
| २८ थंडीचा कहर म्हणजेच शिंप्यांची दिवाळी ... | ५३९ |
| २९ सदर्न निटिंग वर्क्स | ५४१ |
| ३० जाधव टेलरिंग कॉलेज | ५४१ |
| ३१ निवडक बाजारभाव | ५४२ |
| ३२ युनायटेड वेस्टर्न बँक लि. | ५४२ |
| ३३ एक व्यावहारिक राष्ट्रीय सूचना ... ... | ५४२ |
| ३४ सातारा को. लँड मॉर्गेज बँक ... ... | ५४४ |
| ३५ सहकारी परीक्षांचे निकाल | ५४४ |
| ३६ जगांतील सायकली | ५४४ |



**The Co-operators' Book Depot.**

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

**DECCAN BOOK STALL**

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

**फिटिंगची लेखी गॅरंटी देणार**
पहिलेच

सदाशिव पेठ हौदानजिक पुणें शहर. ] **टेलर्स रिसबूड ब्रदर्स** [ प्रोप्रायटर—एम्. व्ही. रिसबूड बी. ए.

# दी प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक

टेलिफोन नं. ७६३. ] **लिमिटेड, पुणें.** [ तारेचा पत्ता "प्रेसिडेन्सी" पुणें.

**१० बुधवार, विश्रामबाग रोड**

अध्यक्ष—श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी., मॅनेजिंग एजंट, कॉमनवेल्थ विमा कंपनी, लिमिटेड.
अधिकृत भांडवल—१०,००,००० दहा लाख रु.
विक्रीकरितां काढलेलें भांडवल—५,००,००० पांच लाख रु.
प्रत्येक शेअर रु. १०० याप्रमाणें ५,००० शेअरमध्यें विभागलेलें. अर्जाबरोबर रु. १५ व अर्जमंजुरीनंतर रु. १०.
ह्या बँकेवरील चेक्स, दि सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया लिमिटेड, मुंबई यांचेमार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात.

**चिं. त्रिं. चितळे,**
मॅनेजिंग डायरेक्टर

## विविध माहिती

### गुन्हेगार जातींच्या वसाहती

मुंबई प्रांतिक सरकारच्या देखरेखीखालील गुन्हेगार जातींच्या वसाहतींत ३१ मार्च, १९३८ रोजीं ८,०२९ लोक होते. त्यापूर्वीच्या सालाचे मानानें हा आंकडा सुमारें २००नीं लहान आहे. सन १९३७–३८ मध्यें वसाहतींमधून २४२ लोक पळून गेले. ह्या वसाहतींबाबत मुंबई सरकारास २ लक्ष, ८८ हजार रुपये खर्च आला. १९३६–३७ मध्यें २ लक्ष, ६८ हजार रुपये खर्च आला होता. मुंढवा येथील वसाहतीसंबंधीं डेक्कन पेपर मिल्सच्या मॅनेजिंग डायरेक्टरांनीं दाखविलेल्या कळकळीबद्दल त्यांचे सरकारनें विशेष आभार मानले आहेत.

### टेलिफोनच्या आणि टेलिग्राफच्या यंत्रें

हिंदुस्तानांत १९३६-३७ सालीं एकूण २२½ लक्ष रुपये किंमतीचीं टेलिफोनचीं आणि टेलिग्राफचीं यंत्रें आणि त्यांचे सुटे भाग ह्यांची आयात झाली; त्यांपैकी १६½ लक्ष रुपयांचा माल ब्रिटिश बनावटीचा आणि सुमारें २ लक्ष रुपयांचा माल जर्मन बनावटीचा होता. हिंदुस्थान सरकार हीं यंत्रें बनविण्याचा कारखाना हिंदुस्थानांत स्वतःच चालविणार असल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

### सुडेटेन विभागांतील कायदेशीर चलन

सुडेटेन विभागांत जर्मनीचें चलन आतां कायदेशीर करण्यांत आलें आहे. बारा राइश फेनिंग्ज = एक झेकोस्लोव्हाकियन क्राउन असें चलनाच्या किंमतीचें प्रमाण ठरविण्यांत आलें आहे. क्राउन नाणेंहि कायदेशीर समजलें जाईल.

### युद्धांत आणि रस्त्यांवरील अपघातांत प्राणहानि

मानवी जीविताचा संहार करणाऱ्या युद्धांचा सर्वत्र धिक्कार होत आहे, हें ठीक आहे. पण गेल्या दहा वर्षांत ग्रेट ब्रिटनमध्यें शांततेच्या स्थितींत रस्त्यांवरील अपघातांमुळें ६७,६९६ माणसें मृत्युमुखीं पडलीं आणि २०,४६,०२८ इतक्या इसमांस दुखापत झाली, त्याचें काय? अशी पृच्छा एका ब्रिटिश मासिकांत केलेली आढळते.

### सक्करच्या धरणामुळें कपाशीच्या लागवडींत वाढ

सक्कर येथील धरणामुळें सिंध प्रांतामध्यें कपाशीच्या पिकास उत्तेजन मिळून १९६१–६२ सालीं ८½ लक्ष एकर जमीन त्या पिकाखालीं येईल असा अंदाज १९३० सालीं करण्यांत आला होता. १९३८ सालींच ९ लक्ष एकरांत कपास लावण्यांत आली आहे!

### पॅलेस्टाइनमध्यें मध्यवर्ती सहकारी संस्था

"हमशबीर" ह्या नांवाची माल पुरवणारी मध्यवर्ती सहकारी संस्था पॅलेस्टाइनमध्यें आहे. शेतीच्या आणि कामगारांच्या १४० सहकारी मंडळ्यांस ती माल पुरवते. १९३७ सालीं सुमारें ५० लक्ष रुपयांची उलाढाल तिनें केली.

### इराणांत आगगाडीचा रस्ता

कॅस्पिअन समुद्र आणि इराणचें आखात ह्यांस जोडणाऱ्या आगगाडीच्या रस्त्याचे कामास १९२७ मध्यें प्रारंभ झाला असून त्यावर दररोज ४५ हजार माणसें खपत आहेत. ह्या कामास एकूण ३५ कोटि रुपये खर्च येईल तो राकेल तेलाच्या खाणींच्या उत्पन्नामधून भरून काढला जाईल. ह्या आगगाडीनें इराणमधील राकेल तेलाच्या धंद्यास चांगलें सहाय होईल.

### दिल्ली येथील प्रदर्शन

दिल्ली येथें २० फेब्रुवारी ते १६ एप्रिल, १९३९ अखेर एक मोठें प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनापासून मिळणारें उत्पन्न क्षयरोग निवारण फंडास देण्यांत यावयाचें आहे.

### लाकडापासून साखर

वाया जाणाऱ्या लाकडापासून साखर तयार करण्यासाठी जर्मनींत एक कारखाना उभारण्यांत येणार आहे. त्याच्या पायाचा दगड नुकताच समारंभानें बसवण्यांत आला. ह्या कारखान्यांत १५ लक्ष रुपयांचें भांडवल घालण्यांत येईल.

### हॉलंडमधील भूपृष्ठाची उंची

हॉलंडमधील भूपृष्ठापैकी फारच थोडा प्रदेश समुद्रसपाटीपेक्षा पंधरा फूटांपेक्षा उंच आहे; त्या देशाचा कांहीं भाग समुद्रसपाटीपेक्षाहि खालीं आहे.

### फ्रान्समध्यें परराष्ट्रीय कामकरी

१९३७ सालीं फ्रान्समध्यें परदेशांतून ९१,१९९ कामकरी आले. त्यांपैकी ७७,२०२ शेतीच्या कामासाठीं आले. ह्यांत बेल्जन व पोलिश लोकांचा विशेष भरणा होता.

### जमीनीवर वहानांचा वेग

साडेदहा सेकंदांत एक मैल ह्या वेगानें एका गृहस्थानें आपली मोटार ग्रेट ब्रिटनमध्यें नुकतीच चालविली. दर तासास ३४५ मैल असा हा वेग झाला.

### ग्लासगो येथील प्रदर्शन

ग्लासगो येथील प्रदर्शन ता. २९ ऑक्टोबर रोजीं बंद झालें. १ कोटि, २० लक्ष लोकांनीं हें प्रदर्शन पाहिलें आणि तेथें कोट्यावधि रुपयांचा माल खपला.

### जगांतील नाणीं

सबंद जगांत मिळून निरनिराळीं सुमारें ३२ हजार प्रकारांचीं नाणीं आहेत, असा अजमास आहे.

### पार्लमेंटगृहांत २६६ घड्याळें

ब्रिटिश पार्लमेंटचे इमारतींत एकूण २६६ घड्याळें आहेत, तीं सर्व बरोबर ठेवण्याकरितां एक स्वतंत्र अधिकारी आहे.

### पोस्ट ऑफिस सेव्हिंग बँकेचा व्याजाचा दर आणखी उतरणार

पोस्ट ऑफिस सेव्हिंग बँकांतील ठेवीवर सध्या शेकडा २ टक्के दरानें व्याज मिळतें. १ डिसेंबर, १९३८ पासून हा व्याजाचा दर उतरवून १½ टक्का करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे.

### ५½ टक्क्यांच्या रोख्यांचें ३ टक्क्यांच्या रोख्यांत रूपांतर

१ नोव्हेंबर, १९३८ रोजीं म्हैसूर सरकारास २ कोटि, १६ लक्ष रुपये कर्जाची परतफेड करावयाची आहे. ह्या कर्जावरील व्याजाचा दर ५½% आहे. कर्जाच्या परतफेडीकरतां त्या सरकारनें ३% दरानें १९५६-६१ मध्यें परत करावयाचें कर्ज उभारण्याचें योजिलें आहे.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| २३-१०-३८ ते २९-१०-३८ | १८,२७४ |
| २१-९-३१ ते २९-१०-३८ | ३,२१,३७,५५,५९५ |

# अर्थ

बुधवार, ता. २ नोव्हेंबर, १९३८


## लक्ष्मीपूजन

दिवाळीच्या आनंदमय सणांत प्रत्येक हिंदू कुटुंबामध्यें आबालवृद्ध जीवितांतली नित्याची काळजी विसरून जाऊन सुखाच्या साधनांचा यथेच्छ उपभोग घेतात. मनुष्य श्रीमान असो वा दरिद्री असो, शहरवासी असो अथवा ग्रामस्थ असो, आपापल्या सामर्थ्याप्रमाणें तो हा सण साजरा करतो. स्वच्छ व सुभूषित घरें, सुवासिक द्रव्यें, मिष्टान्न भोजन, दिव्यांचा लखलखाट, उंची व दिखाऊ वस्त्रें, गायनाची करमणूक इत्यादि प्रकार सर्वत्र दिसून येतात. वर्षांतून दोनचार दिवस याप्रमाणें सुखानें आणि कौटुंबिक प्रेमानें घालवण्याच्या ह्या प्रघाताचें सामाजिक महत्व विशेष आहे. संसारांत यशापयशाचें आणि सुखदुःखाचें चक्र सारखें फिरत असतें. दोन दिवस त्यांतलें दुःख आणि चिंता विसरून वातावरण आनंदमय व आशामय करण्यांत मनुष्य आपल्या जीवनास नवीन व अनुकूल वळण लावूं पहातो. कुटुंबांतील माणसांनीं, आप्तेष्टांनीं आणि मित्रपरिचितांनीं दिवाळी एकत्र करण्यांत स्नेहभाव आणि सामाजिक संघटन ह्यांची वाढ होते. सांपत्तिक स्थिति चांगली असल्यास ती आणखी चांगली व्हावी किंवा तशीच टिकावी आणि ती बरी नसल्यास सुधारावी अशी इच्छा दिवाळीचा सण लोकांच्या मनांत उत्पन्न करतो. घरांतील आणि रस्त्यांतील अंधेर दिव्यांच्या प्रकाशानें दूर होऊन त्यांस दिवाळीमुळें शोभा येते, त्याचप्रमाणें तो सण साजरा केल्यानें जनतेचीं मनें स्वच्छ आणि प्रसन्न होतात. प्रदीर्घकालपर्यंत टिकून राहिलेल्या सध्याच्या आर्थिक मंदीच्या काळांतहि महाराष्ट्रांत सर्वत्र दिवाळी उत्साहानें साजरी करण्यांत आली ही गोष्ट समाधानकारक आहे. प्रतिकूल परिस्थितीनें मन विषण्ण होऊं न देतां तिच्यामधूनहि सुख आणि आनंद उत्पन्न करण्यांत समाजाची खेळाडू आणि उत्साही प्रवृत्ति दिसून येते. महाराष्ट्राच्या अभ्युदयास हीच प्रवृत्ति सहाय करील.

लक्ष्मीपूजनास दिवाळीच्या सणांत विशेष महत्त्वाचें स्थान आहे, त्याचें रहस्य लक्षांत येणें आवश्यक आहे. लक्ष्मीची पूजा करून तिचा कृपाप्रसाद घ्यावयाचा आणि पुढील वर्षांतल्या द्रव्यार्जनाची पूर्वतयारी करावयाची असा हा प्रघात आहे. हिंदी संस्कृति ऐहिक सुख तुच्छ मानणारी आणि भौतिक उन्नतीस प्रतिकूल अशी आहे आणि ह्या गोष्टीचा अडथळा हिंदुस्थान देशाच्या आर्थिक प्रगतीस होत आहे अशी समजूत कित्येक पाश्चात्य लेखकांनीं स्वतः करून घेऊन ती पसरवली आहे. ही कल्पना किती चुकीची आहे हें लक्ष्मीपूजनाच्या पूर्वापार चालत आलेल्या सार्वत्रिक प्रघातावरून स्पष्ट दिसून येण्यासारखें आहे. धनधान्यसमृद्धीचा लाभ आपणांस व्हावा आणि आपल्या कुटुंबास आर्थिक सुखप्राप्ति व्हावी अशी इच्छा धारण करून त्यासंबंधांत प्रत्येक जण लक्ष्मीची प्रार्थना करतो. व्यापारी आणि धंदेवाली मंडळी आपल्या व्यवहाराच्या हिशेबाच्या नव्या वह्या विधिपूर्वक घालतात आणि सुमुहूर्तानें वर्षाचा प्रारंभ करतात. ह्या मुहूर्ताच्या निमित्तानें व्यापारी लोक सवदे करतात आणि आपलें व्यवहारचक्र नव्यानें चालू करतात. ह्या रीतीनें लक्ष्मीपूजनास धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक बाजू आहेत, त्या ध्यानांत घेणें आवश्यक आहे.

यंदाचें लक्ष्मीपूजन आर्थिक मंदीच्या परिस्थितींतच झालें. जगाच्या निरनिराळ्या बाजारांत अजून स्थिरता आलेली नाहीं आणि युरोपमधील झेकोस्लाव्हेकिया प्रकरणानें अलीकडे त्यांत गडबड उडवून दिली होती. तें प्रकरण तूर्त मिटलें असलें तरी शांतता कायमची प्रस्थापित झालेली नाहीं, इतकेंच नव्हे तर जर्मनीच्या महत्त्वाकांक्षेस आणखी फाटे फुटत आहेत. चीनमध्यें जपानचें आक्रमण चालू असून स्पेन व जेरूसलेम येथें बंडाळी माजून राहिली आहे. हिंदुस्थानचा विशेष हितसंबंध असलेल्या शेतीच्या मालाचे बाजारभाव मंदीचे आहेत. त्या कारणानें येथील व्यापार आणि उद्योगधंदे नरमाईच्या स्थितींत आहेत. शनिवार तारीख २२ रोजीं मुंबईस “मूरत” व्यवहार झाले, त्यांत कपास, गळिताचीं व इतर धान्यें, सोनें-चांदी, रोखे, कापड, सूत इत्यादि संबंधांतल्या निरनिराळ्या बाजारांत वरील स्थितीचें प्रतिबिंब उमटलेलें प्रत्ययास आलें. तथापि, येईल त्या परिस्थितींत अधिकांत अधिक संपत्ती मिळवण्याच्या उद्देशानेंच लक्ष्मीची आराधना केली जात असते हें विसरतां कामा नये. मंदीनें शेतीच्या धंद्यास भयंकर धक्का दिला आहे. त्याच्या आपत्तीच्या निवारणाचे यत्न चालू आहेत, ते अधिक जोमानें चालविले पाहिजेत. बदललेल्या आणि बिकट बनलेल्या परिस्थितींत आधुनिक पद्धतीचे उद्योगधंदे आणि आर्थिक व्यवहार ह्यांच्या मार्गावर महाराष्ट्रानें पाऊल टाकलें आहे, त्या उपक्रमांत लक्ष्मीपूजनाच्या व्यावहारिक स्वरूपाचें महत्त्व यथायोग्य लक्षांत येणें अगत्याचें आहे. लक्ष्मी सुप्रसन्न होण्यास तिची नुसती औपचारिक पूजा करून भागत नाहीं. संघटित आणि निश्चयात्मक प्रयत्न, त्याचप्रमाणें, पद्धतशीर, कष्टाळूपणाचे व सचोटीचे व्यवहार आणि चिकाटी व धैर्य ह्यांची आवश्यकता असते. ह्या गुणांनीं संपन्न असलेल्या समाजावर लक्ष्मीचा वरदहस्त रहातो. उद्योगी आणि धैर्यवान पुरुषास लक्ष्मी प्रसन्न होते हें जुनें वचन प्रसिद्धच आहे. अलीकडे महाराष्ट्रांत आर्थिक उन्नतीचे बाबतींत इष्ट असें व्यावहारिक वळण लागत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. शेतकरी, कारागीर, लहान-मोठे उत्पादक, कारखाने, विमा मंडळ्या, बँकिंगचा व्यवहार करणाऱ्या संस्था, छोटे-मोठे व्यापारी व दुकानदार इत्यादि मंडळी उत्साहानें आपापले उद्योग चालवीत आहेत. ह्या सर्व महाराष्ट्रीय धंदेवाल्यांस यंदाचें लक्ष्मीपूजन यशस्वी होवो आणि त्यांच्या कार्यक्रमांच्या मार्गांतील अडचणी दूर होऊन त्यांचे संकेत आपलें ध्येय यथाक्रम गाठोत असें आम्ही इच्छितों.

---

### हुंडणावळीस हात लावूं नका ! कां ?

परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर आयात-निर्गतीच्या व्यवहारांवर सामान्यतः अवलंबून रहातो, आणि तो शक्यतोंवर स्थिर ठेवण्याचा प्रयत्न राष्ट्रीय मध्यवर्ती बँका आणि सरकारें करीत असतात. हुंडणावळ अस्थिर झाली असतां व्यापारी व्यवहारांस जुगारीचें स्वरूप प्राप्त होत असल्यानें तिच्या दरांत विशेष चलबिचल न होण्याविषयीं खबरदारी घेण्यांत येते. परंतु आंतरराष्ट्रीय घडामोडी दीर्घपरिणामकारक होऊं लागल्या असतां राष्ट्रीय उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांच्या हिताच्या संरक्षणार्थ हुंडणावळीचे दर कमी-ज्यास्त करणें अपरिहार्य होतें. ह्या कारणासाठी

इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, बेल्जम इत्यादि राष्ट्रांनीं गेल्या पांच-सात वर्षांत आपल्या चलनांचे परराष्ट्रीय चलनांच्या मोबद्-ल्याचे म्हणजेच हुंडणावळींचे दर जरूरीप्रमाणें बदलले आहेत. बाजारभाव आणि हुंडणावळ ह्यांचा परस्पर-संबंध अत्यंत निकट असतो. हुंडणावळ स्थिर राहिली तर तिच्या दरानें मापल्या जाणाऱ्या पदार्थांच्या राष्ट्रांतर्गत किंमती कमी-जास्त होतात; आणि बाजारभाव स्थिर रहावयाचे असतील तर हुंडणावळीचा दर योग्य प्रमाणांत कमी-जास्त करावा लागतो. बाजारभावांवर देशाच्या मिळकती अवलंबून असल्यानें ते स्थिर राखणें हितावह असतें आणि त्यांच्या स्थैर्यासाठीं हुंडणावळीचा दर बदलणें अपरिहार्य होतें. हुंडणावळीचें स्थैर्य इष्ट आहे खरें; पण तें राष्ट्रीय उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांस विघातक होऊं देतां कामा नये. अठरा पेन्सांच्या स्थिर हुंडणावळींत बदल व्हावा ह्या हिंदी लोकांच्या मागणीचा विचार वरील विवेचनाच्या दृष्टीनें केला पाहिजे.

मद्रास युनिव्हर्सिटींतले अर्थशास्त्राचे अध्यापक, डॉ. टॉमस, ह्यांनीं अठरा पेन्सांच्या हुंडणावळीविरुद्ध चाललेल्या हिंदी चळवळीसंबंधानें प्रतिकूल मत व्यक्त केल्याचें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. त्यांनीं वर नमूद केलेली विचारसरणी दृष्टी-आड करून हिंदुस्थान सरकारच्या हुंडणावळीविषयींच्या धोरणास उचलून धरलें आहे. हुंडणावळीची स्थिरता हें कांहीं ध्येय नव्हे ही गोष्ट ते विसरले आहेत. शेतीच्या मालाचे बाजारभाव हिंदुस्थानांत चढल्यावांचून हिंदी जनतेची सध्याची हलाखी दूर होणार नाहीं हें स्पष्ट आहे. इतर गोष्टींचा विचार करतां हिंदी हुंडणावळीचा दर १८ पेन्सांचा १६ पेन्स केल्यानें बाजारभाव चढून शेतकरी वर्गाची मिळकत वाढणें आणि प्रचलित आर्थिक मंदीस आळा बसणें शक्य दिसल्यास हा फेरबदल आम्हीं कां करूं नये ? त्यांत वावगें काय आहे ? इतर राष्ट्रांनीं ही गोष्ट मागेंच केली असतां हिंदुस्था-नास ती करण्यास आडकाठी कां असावी ? उत्पादन वाढवून, बेकारी दूर करून आणि जनतेची राहाणी सुधारून सध्याचा हलाखीचा प्रश्न आम्हीं सोडवला पाहिजे असें डॉ. टॉमस म्हणतात. रोगी माण-साचें दुखणें बरें करण्याचा उपाय हवा असतां, त्याची प्रकृति निकोप असावी, त्यानें यथेच्छ खावें, प्यावें आणि आनंदी असावें हा इलाज आमचे डॉक्टर सांगत आहेत ! साध्य गोष्टच साधन आहे, असा कार्यकारणाचा घोटाळा त्यांनीं करून हास्यास्पद कोटिक्रम मांडला आहे.

हुंडणावळीच्या दरांचा एका काळचा सोवळेपणा अली-कडे नाहींसा झाला आहे आणि राष्ट्रीय आर्थिक परि-स्थितीच्या दृष्टीनें त्यांत फेरबदल करण्याचा प्रघात पाश्चात्य राष्ट्रांनीं पाडला आहे. हुंडणावळ सारखी हेलकावे खात रहावी असें कोणीच म्हणत नाहीं. तिच्यांत स्थैर्य असावें ह्या विषयीं मतभेद नाहीं. परंतु जग इकडचें तिकडे झालें तरी हिंदी परराष्ट्रीय हुंडणावळीच्या दरास हात लावण्याचा विचारहि करूं नका असें म्हणणें हा केवळ दुराग्रह आहे. हुंडणावळीच्या स्थैर्याचें स्तोम माजवणें चुकीचें आहे असा स्पष्ट अभिप्राय बॅबिंग्टन स्मिथ चलन चौकशी कमिटीनें व्यक्त केला होता त्याकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. घड्याळाचे काटे पुढें-मागें केल्यानें दिवस लहान-मोठा होऊं शकत नाहीं, त्याप्रमाणें हुंडणावळीचा दर उतरवल्यानें राष्ट्राची संपत्ति वाढत नाहीं, हें तात्त्विक दृष्ट्या मान्य केलें पाहिजे. परंतु राष्ट्रांतले बाजारभाव आणि लोकांची मिळकत हीं परराष्ट्रीय व्यापार व जागतिक बाजारभाव ह्यांच्याशीं प्रमाणशीर जुळतीं करून घेण्यास हुंडणावळीच्या दरांत कमी-ज्यास्ती करणें हा सर्वमान्य व अनुभवसिद्ध उपाय आहे हें विसरून चालणार नाहीं.

## न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लि. मुंबई.

नामांकित बँकांनीं गजबजलेल्या मुंबई शहरांत न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि. ह्या संस्थेनें अल्पावधींत केलेल्या कार्याचा विस्तार तिचे उत्पादक आणि चालक ह्यांस भूषणावह आहे. श्री. डी.डी. देशपांडे, बी. ए., एफ. सी. आर. ए. (ग्लासगो) हे या बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर असून त्यांची कळकळ, उत्साह आणि व्यवहार-कौशल्य हीं या संस्थेच्या स्थापनेस कारणीभूत झालीं आहेत. श्री. जमनादास मेथा बँकेचे चेअरमन आहेत आणि श्री.मेयर निसीम हे ठेवीदारांचे वतीनें डायरेक्टर आहेत. डायरेक्टरांचे बोर्डांत इतर वजनदार मंडळी आहेत. स्टॅट्युटरी रिपोर्टाचे वेळेपर्यंत ( २४ ऑगस्ट, १९३८ ) बँकेचें एकूण खेळतें भांडवल ५ लक्ष ८२ हजार रुपयांचे वर गेलें होतें. अलीकडे भागांच्या भांडवलाची रकम अडीच लक्ष रुपयां-पेक्षा अधिक झाली आहे. स्टॅट्युटरी रिपोर्टास जोडलेल्या हिशो-बाचे तक्त्यांत वसूल झालेल्या एकूण भांडवलाचा आकडा १ लक्ष ४४ हजार रुपयांचा होता, ह्यावरून बँकेच्या झपाट्यानें चाललेल्या प्रगतीची कल्पना येते. वरील तारखेस बँकेकडे ४ लक्ष ३९ हजार रुपयांच्या चालू व सेव्हिंग खात्यांवरील ठेवी होत्या आणि मुदतीच्या ठेवींची रकम ७९ हजार रुपये होती. सुमारें दीड लक्ष रुपये कर्जाऊ देण्यांत आले होते आणि १ लक्ष ८० हजार रुपये रोखे, भाग इत्यादींत गुंतवण्यांत आले होते. अगदीं अलीकडच्या माहितीवरून ह्या सर्व रकमांत भर पडली आहे असें दिसून येतें. बँकेचे डिफर्ड, ५% क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स आणि ऑर्डिनरी असे तीन वर्गांचे भाग आहेत. मुंबईसारख्या शहरीं नवीन बँक स्थापण्याचें तिच्या उत्पादकांचें धाडस कौतु-कास्पद असून त्यांच्या कार्यास येत असलेलें यश त्यांस भूषणावह आहे.

### सिगारेट्सचा धूर

कॅनडा देशांतल्या लोकांनीं गेल्या एका वर्षांत ६८४ कोटि सिगारेट्स ओढल्या, आणि त्यांप्रीत्यर्थ सुमारें २५ कोटि रुपये खर्च केले. सिगारेट्सचीं वाया जाणारीं थोटुकें हिशेबांत धरलीं तर ह्यापैकीं पांच कोटि रुपये त्या ओढणारांचे फुकट गेले !

आपणांस आयुर्विम्याच्या शास्त्रशुद्ध व फायदेशीर योजना हव्या असतील तर त्या

**इंडियन प्रोग्रेसिव्ह**

इन्शुअरन्स कंपनी लि. पुणें शहर या कंपनींतच मिळतील

ठिकठिकाणीं अनुभवी व मेहनती प्रचारक नेमणें आहे. मासिक पगाराखेरीज, प्रवासखर्च व भरपूर कमिशन

श्री. आर. जी. काळे
ऑर्गनायझर,
बेडेकर बिल्डिंग
दादर.

सेक्रेटरी
हेड ऑफिस
पुणें.

# स्फुट विचार

## आमचा दिवाळी अंक

"अर्था"च्या ह्या अंकांत दिवाळीच्या निमित्तानें ३२ पानें घालण्यांत आलीं आहेत. व्यापार, कारखानदारी, बँकिंग, शेती, विमा व्यवसाय, सहकार इत्यादि धनोत्पादक विषयांसंबंधानें विविध आणि उपयुक्त माहिती देऊन व चर्चा करून महाराष्ट्रीय जनतेस आर्थिक प्रगतीच्या मार्गाकडे प्रवृत्त करणें आणि औद्योगिक उन्नतीस उपकारक होईल असें उत्तेजन आणि सल्ला देणें हा "अर्था"चा मुख्य उद्देश असल्यानें प्रमुख महाराष्ट्रीय उद्योगांचें स्वरूप वाचकांपुढें मधून मधून मांडण्याचा आणि चालू असलेली औद्योगिक प्रगति दिग्दर्शित करण्याचा आमचा प्रघात आहे. महाराष्ट्रीय व्यापारी, कारखानदार आणि इतर व्यवसायी मंडळींचें ह्या कामीं योग्य सहकार्य मिळाल्यास हें कार्य विस्तृत व अधिक उपयुक्त प्रमाणांत करतां येईल. अशा प्रकारच्या योजनेचा उपक्रम ह्या अंकांत आम्हीं केला आहे. कित्येक व्यवसायी मित्रांचें सढळ सहकार्य "अर्था"स प्रथमपासूनच मिळालें आहे आणि त्याबद्दल आम्हीं त्यांचे ऋणी आहों. व्यवस्थितं आणि पद्धतशीर रीतीची औद्योगिक प्रगति आणि "अर्था"चें कार्य हीं परस्पर पोषक आहेत आणि हें सहकार्य अधिक विस्तृत आणि फलद्रूप व्हावें अशी आमची इच्छा आहे. योग्य दर्जाचें व व्यावसायिक अर्थविषयक वाङ्मय महाराष्ट्रांत प्रसिद्ध होऊन त्याचें स्फूर्तिदायक आणि मार्गदर्शक सहाय उद्योगधंद्यांच्या आणि व्यापाराच्या अभिवृद्धीस होणें अगत्याचें आहे. ह्या अंकाचे संबंधांत आम्हीं कांहीं थोड्या मित्रांसच विनंति केली आणि त्यांनीं माहिती, लेख आणि जाहिराती तत्परतेनें पाठवून दिल्या, ह्याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे. इतर व्यवसायी मित्र ह्याच रीतीनें आम्हांस उपकृत करून "अर्था"चें उद्दिष्ट कार्य यशस्वी होण्यास मदत करतील अशी आम्हांस उमेद आहे. निरनिराळ्या धंद्यांतल्या मंडळींनीं आपापल्या उद्योगांची प्रगति, तद्विषयक नवीन कल्पना व योजना इत्यादि बाबत वेळोवेळ माहिती पुरवल्यास आम्हीं तिचा परामर्श आनंदानें घेऊं. ही प्रसिद्धी सदरहु धंद्यांस उपकारक होऊन महाराष्ट्रीय जनतेस उपयुक्त होईल.

---

## कारखान्यांतील तंट्यांबाबतचा कायदा

प्रांतिक असेंब्लीमध्यें मुंबईच्या प्रधान मंडळानें कारखान्यांतील मालक-मजुरांचे तंटे सामोपचारानें मिटविण्याच्या संबधांत कायद्याचा मसुदा मांडला आहे, त्याची चर्चा कित्येक आठवडे रेंगाळत असून ती लौकर पुरी होण्याकरितां कायदेमंडळाच्या कामाचा वेळ वाढवावा लागला आहे. कामकरी वर्गाच्या प्रतिनिधींचा व पुरस्कर्त्यांचा ह्या मसुद्यास तीव्र विरोध आहे आणि तो उठावदार रीतीनें व्यक्त करण्यासाठी येत्या ७ तारखेस एक दिवस सर्व कामकऱ्यांनीं सर्वत्र काम बंद पाडावें अशाविषयीं संपाची तयारी चालली आहे. सध्याचें प्रांतिक प्रधानमंडळ वस्तुतः कामकरी वर्गाच्या हिताचें पुरस्कर्ते आहे. कारखानदार आणि कामगार ह्यांच्यामध्यें तंटे उपस्थित झाले असतां त्यांचा योग्य रीतीनें निकाल लागावा आणि शक्यतोंवर ते विकोपास जाऊं देऊं नयेत हा त्यांच्या बिलाचा उद्देश आहे आणि त्यास अनुलक्षून करण्यांत आलेली बिलांतील कलमांची मांडणी जनतेस सामान्यतः मान्य होण्यासारखी आहे. कामकरी वर्गास अमान्य होऊं नये अशीच सहानुभूतीची भूमिका जनतेची असते आणि कारखानदार किंवा मजूर ह्यांपैकी कोणत्याहि पक्षाच्या हितसंबंधांविषयीं आग्रही स्वरूपाची तरफदारी तिला पसंत पडत नाहीं. कामकरी वर्गाच्या पुरस्कर्त्यांच्या मतानें असेंब्लींत चर्चिलें जाणारें बिल सर्वस्वी टाकाऊ आहे, आणि म्हणून त्यास पदोपदीं विरोध करण्यांत येत आहे. तथापि, त्यांच्यामध्येंहि तीव्र मतभेद आहेत, ते आतां स्पष्ट झाले आहेत. त्यांचेपैकी कांहीं पुढाऱ्यांच्या मतें प्रस्तुत बिल सदोष असलें तरी तें सुधारून घेतां येण्यासारखें आहे आणि ह्यासाठी सार्वत्रिक हरताळ एक दिवस पाडण्याविषयींच्या सूचनेस त्यांचा विरोध आहे. दोन्हीं बाजूंचा आपापल्या मताच्या पुष्ट्यर्थ जोराचा प्रचार चालू आहे. कामकऱ्यांचा संप करण्याचा हक्क अबाधित राहिला पाहिजे आणि तो प्रधान मंडळाच्या योजनेंत हिरावून घेतला जात आहे असें मजूरपक्षाच्या कांहीं पुढाऱ्यांचें म्हणणें आहे. चौकशी आणि विचार होण्यास संधी मिळाल्यावांचून कारखान्यांतलें काम बंद पाडण्याची शक्यता मालकांस किंवा कामकऱ्यांस असूं नये आणि त्यांच्यामधील तंट्यांचा निकाल तडजोडीनें होण्याची पराकाष्ठा केली जावी असा बिलाचा मुख्य हेतु आहे. तडजोडीचें आणि सामोपचाराचें धोरणच सामान्यतः लोकांस पसंत पडतें आणि पडावें. कोणत्याहि सरकारी धोरणाकडे किंवा कायद्याकडे जनता ह्याच भावनेनें शेवटीं पाहिल्यावांचून रहाणार नाहीं.

---

## उज्जयिनी येथें प्रो. काळे ह्यांचीं दोन व्याख्यानें

उज्जयिनी येथील सातव्या शरद् व्याख्यान मालेंत यंदां कित्येक नामांकित वक्त्यांचीं भाषणें झालीं. प्रो. काळे ह्यांस "सहकार" ह्या विषयावर व्याख्यान देण्याची विनंति करण्यांत आल्यामुळें त्यांनीं रायबहादुर लालचंद सेठी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं १३ ऑक्टोबर रोजीं इंग्रजींत भाषण केलें. मालेचे अधिकारी, श्री. मसूरकर, ह्यांनीं दीनबंधु अँड्र्यूज ह्यांचा मालेस आलेला संदेश प्रथम वाचून दाखविला. गरीब आणि अज्ञानी जनतेस दारिद्र्य व दुःस्थिति ह्यांच्या पंकांमधून वर काढणें आणि ह्या कार्यासाठीं शिकलेल्या लोकांनीं स्वार्थत्यागपूर्वक प्रयत्न करणें ह्या दोन गोष्टींवर संदेशांत भर देण्यांत आला होता. हाच संदेश आपल्या व्याख्यानाचा पाया आहे असें सांगून प्रो. काळे ह्यांनीं सहकारी संघटनेंत त्यांचेंच प्रामुख्यानें महत्व आहे हें विशद केलें. अडाणी आणि दरिद्री जनतेस स्वतःच्या पायावर उभें रहाण्यास शिकवून तिच्यामध्यें आर्थिक सामर्थ्य उत्पन्न करणें सध्याच्या जीवनकलहाच्या बिकट परिस्थितींत कसें अगत्याचें झालें आहे हें युरोपिअन राष्ट्रांचे दाखले देऊन व्याख्यात्यांनीं स्पष्ट केलें. मध्यम स्थितींतल्या लोकांनीं स्वतःच्या आणि सामान्य जनतेच्या हितासाठीं सहकारी संघटनेची कास धरावी आणि सध्याच्या आर्थिक मंदीचा व बेकारीचा प्रश्न सोडवावा असें सांगून व्याख्यात्यांनीं आपलें भाषण पुरें केलें. दुसरे दिवशीं त्याच मालेच्या विद्यमानें प्रो. काळे ह्यांचें मराठींत व्याख्यान झालें. जगांत आजकाल उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांच्या कोणत्या प्रकारच्या घडामोडी चालू आहेत आणि त्यांचे आर्थिक परिणाम हिंदुस्थान देशावर कसे होत आहेत, ह्याचें वर्णन करून व्याख्यात्यांनीं आपल्या भाषणांत स्वदेशी धंद्यांच्या स्थापनेचें महत्त्व श्रोत्यांच्या मनावर ठसविलें. आर्थिक उत्क्रांतीच्या काळांत हिंदी लोकांनीं औद्योगिक आणि व्यापारी संघटना करून स्वतःची प्रगति घडवून आणली नाहीं तर देश अधोगतीस जाऊन त्यास भयंकर स्थिति प्राप्त होईल ह्याचें शब्दचित्र त्यांनीं रेखाटलें आणि औद्योगिक उन्नतीची यथातथ्य कल्पना श्रोत्यांस करून दिली.

---

### बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.

श्री. अण्णासाहेब वर्तक ह्यांचें नेतृत्त्व, ते व सहकारी ह्यांची चिकाटी आणि श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे, बी. ए. एलएल.बी. ह्यांचे भगीरथ प्रयत्न ह्यांमुळेंच वरील कंपनीची उभारणी व समाधानकारक प्रगति शक्य झाली आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल २० लक्ष रुपये आहे. कंपनीच्या कारखान्याची यंत्र-सामुग्री आतां उभी करण्यांत आली असून येत्या जानेवारीपासून साखर तयार करण्यास प्रारंभ होईल. सुमारें ३,२०० एकर जमीन सिंडिकेटनें उंसाकरितां आज तयार केली आहे. चालू मोसमांत सुमारें ४ लक्ष रुपयांची साखर तयार होईल आणि १९३९-४० सालीं १२ लक्ष रुपयांची साखर बनवितां येईल. सिंडिकेटचा कारभार अत्यंत काटकसरीनें चालविण्यांत येत आहे. २ वर्षांनीं परतफेडीच्या ५½ टक्के व्याजाच्या ठेवी सिंडिकेट स्वीकारते. मोठ्या प्रमाणावरील निर्भेळ महाराष्ट्रीय उद्योगधंदा ह्या दृष्टीनें वरील कारखान्याचें महत्त्व विशेष आहे. जनतेचा आश्रय संपादन करण्यांत सिंडिकेटला चांगलें यश मिळालें असून तें भावी उत्कर्षाचें आशाजनक सुचिन्ह आहे.

### वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कं. लि.

वरील कंपनीनें गेल्या पंचवीस वर्षांमध्यें आपल्या पायाशुद्ध आणि काटकसरीच्या कारभारासंबंधानें लौकिक मिळविलेला असून हिंदुस्थानांतील विमा कंपन्यांत तिनें अत्यंत उच्च स्थान प्राप्त करून घेतलेलें आहे. १९२९ सालापासून कंपनी अव्याहत-पणें हयातींतील विम्यावर २० रुपये आणि हयातीनंतरच्या विम्यावर २५ रुपये बोनस देत आली आहे. कंपनीचे फंड भरपूर असून ते किफायतशीर गुंतलेले आहेत. तिचें धोरण सावधगिरीचें तथापि प्रगतिपर असें आहे. खर्चाचें आणि रद्द होणाऱ्या पॉलि सींचें तिचें प्रमाण अत्यल्प आहे. कंपनीनें स्वतःच्या मालकीची मुंबई येथें कोटांत प्रचंड इमारत बांधली आहे. कंपनीच्या शाखा आणि उपशाखा देशभर पसरल्या आहेत. तिच्या स्थापनेस लवकरच २५ वर्षें पूर्ण होणार असून तिचा रौप्य महोत्सव थाटानें साजरा होणार आहे.

### दि वर्ल्डवाइड ॲशुरन्स लि. पुणें

सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय इंजीनीयर श्री. अण्णासाहेब वर्तक यांचे अध्यक्षतेखाली या कंपनीची स्थापना झाली असून कंपनीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्समध्यें श्री. सरदार आबासाहेब मुजुमदार, श्री. डी. आर. लिमये, ( नाशिक, ) त्याचप्रमाणें रा. ब. डॉ. व्ही. व्ही. मुळे, अध्यक्ष सोलापूर म्युनिसिपॅलिटी, यांच्या सारखी महाराष्ट्रीय मंडळी आहेत. डायरेक्टर्स व विमेदार यांचे सोईकरितां गेल्या वर्षापासून कंपनीनें आपलें हेड ऑफीस पुणें येथें आणलें असून कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरचे जागीं व्यापार-धंद्यांत प्रसिद्धी पावलेले सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय गृहस्थ श्री. र. चिं. सोहोनी यांची नेमणूक करण्यांत आली आहे. कंपनीच्या विमाविष-यक विविधयोजना अत्यंत लोकप्रिय असून त्यांत घड्याळाची अर्थात दैनिक हप्त्यांची योजना, स्त्रियांसाठी खास योजना व एक हप्त्यांची डिबेंचर योजना, यांचा प्रामुख्यानें उल्लेख करतां येण्यासारखा आहे. कंपनीनें आतांपर्यंत सुमारें सात लाख रुपयांहून अधिक रकमेचे विमे मिळविले असून कंपनीची प्रगति होत आहे. वजन-दार डायरेक्टर बोर्ड, लोकप्रिय विमा योजना व चोख व्यवस्था यांचे जोरावर कंपनीस लवकरच विम्याच्या धंद्यांत चांगलें स्थान मिळेल अशी आशा आहे.


## पुण्यांत कापड कोठें घ्याल ?

घाऊक व किरकोळ माफक भावानें
अप्-टु-डेट फॅशनचें सर्व
प्रकारचें कापड

दिवाळींत जशीं नवींनवीं पक्वानें
तशीं लेटेस्ट डिझाईनचीं पातळें,
लुगडीं, खण ( जरी-रेशमी ), होजि-
अरी. सर्व नव्यांत नवे प्रकार.

—थंडीचा रुमझुम नाच—

चालू झाला. रग्ज-शाली-स्वेटर्स-होजिअरी वगैरे माल आजच घेऊन ठेवा.

देशबंधु स्वदेशी स्टोअर्स
बेलबागेशेजारीं, लक्ष्मी रोड, पुणें.



## ' विमेदारांस बिनमोल सवलती '

१. आजारीपणांत औषधपाण्याकरितां मदत मिळते.
२. शस्त्रक्रियेकरितां लागणाऱ्या खर्चाची सोय केली जाते.
३. कायमचा पंगूपणा आल्यास पुढील हप्ते न भरतां संपूर्ण विम्याची रक्कम मिळते.
४. अडचणीचे वेळीं थकलेले हप्ते न भरतां पॉलिसी चालू करतां येते.

विशेषः—वरील संरक्षणांनीं युक्त असलेल्या "वर्ल्डवाइड" पॉलिसीचे दरहि माफकच असतात. विशेष माहितीकरितां लिहा अगर भेटा.

दी वर्ल्डवाइड ॲशुअरन्स लि.
५५१ शनवार. पुणें २.



## अभ्यंकर आणि जोशी

इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स

सिमेंट कॉंक्रीट स्पेशालिस्ट्स, पुणें २.



## अपघात

नेहमी होतात, याला कारण मोटार ड्रायव्हरांचें
ड्रायव्हिंगबद्दल अज्ञान होय !

हुशार, अनुभविक आणि निर्व्यसनी असे
ड्रायव्हर आम्हीं पुरवूं शकतों.

चौकशी कराः—

दि पूना प्रायव्हेट मोटार ड्रायव्हर्स असोसिएशन

सेक्रेटरीः— द. रा. कुलकर्णी
२१६ बुधवार, पुणें शहर.

## मध्यवर्ती सहकारी बँकांच्या घटनेंतील कांहीं दोषस्थळें

[ लेखकः—"सहकारी" ]

सहकारी संस्थांचें ध्येय व नैतिक अधिष्ठान यांविषयीं आपण नेहमी तात्त्विक व गंभीर स्वरूपाचे विचार या चळवळीचे अग्र-भागीं दिसणाऱ्या पुढारी मंडळींचे तोंडून प्रतिपादिलेले ऐकतों, व वरील ध्येयाची व नैतिक अधिष्ठानाची थोडीशीहि उपेक्षा झाल्यानें चळवळीच्या लौकिकास कमीपणा येतो, असा निर्वाणीचा इषाराहि त्यांनीं वेळोवेळीं दिल्याचें आपणांस स्मरतें. परंतु वरील ध्येयवादी विचारसरणीशीं सहकारी संस्थांच्या ऐहिक संसाराची योग्य सांगड कशी घालावयाची हा कांहीं वेळां मोठा "कूट प्रश्न" म्हणून या चळवळींतील कार्यकर्त्यांचे पुढें येऊन पडतो व अशा वेळीं ध्येयदृष्टि बाजूस टेऊन व्यवहारासच प्राधान्य देणें कर्तव्य–प्राप्त होतें. अशा प्रसंगीं ध्येयवादाची व नैतिक अधिष्ठानाची महती सांगणाऱ्या जबाबदार पुढाऱ्यांकडूनच तत्त्वाशीं विसंगत अशी कृति आचरिली जाते. या दृष्टीनें मध्यवर्ती जिल्हा सहकारी बँका, त्यांचें ध्येय व त्यांचा प्रत्यक्ष व्यवहार या संबंधांतील आमचे विचार या चळवळींतील कार्यकर्त्यांचे पुढें मांडण्याचें आम्हीं योजिलें आहे.

### ध्येयात्मक आदर्श घटना

मध्यवर्ती सहकारी बँकांची उभारणी व योजना, मूलतः तिच्या कार्यक्षेत्रांतील ज्या आपल्या सभासदांशीं प्रत्यक्षपणें कर्जाच्या देवघेवीचा व्यवहार करतात, अशा प्राथमिक सहकारी संस्थांना आवश्यक असणारी आर्थिक मदत सुकरतेनें व्हावी याच मुख्य हेतूनें करण्यांत आली. वरील उद्दिष्टाच्या तात्त्विक कसोटीनें पाहूं गेल्यास सेंट्रल बँक म्हणजे लहान लहान प्राथमिक सहकारी सोसायट्यांची केंद्रीभूत झालेली अशी एक "मध्यवर्ती सहकारी संस्था" अगर "सोसायट्यांचें फेडरेशन" अशाच तऱ्हेचें एकांगी स्वरूप सेंट्रल बँकेला द्यावें लागेल; परंतु वस्तुस्थिति मात्र यापेक्षा फारच भिन्न स्वरूपाची आहे व हीच गोष्ट आम्हांस प्रामुख्यानें वाचकांचे नजरेस आणावयाची आहे. सेंट्रल बँक म्हणजे तिच्या कार्यक्षेत्रांतील सहकारी सोसायट्यांचें "फेडरेशन" ही ध्येयदृष्टि ठेऊन तिची घटना आखण्यांत आली व अशा प्रकारें प्राथमिक सोसायट्यांच्या हितसंबंधांचें योग्य प्रकारें रक्षण व्हावें म्हणून मध्यवर्ती बँकेच्या कारभारी मंडळांत या सोसायट्यांचे प्रतिनिधींना बहुमत राखुन ठेवण्यांत आलें. मध्यवर्ती बँकांचा प्रत्यक्ष कारभार चालवितांना मात्र असा अनु-भव आला कीं, सेंट्रल बँकांच्या कार्यक्षेत्रांतील सोसायट्यांना जो पैसा सढळपणें व सुकरतेनें पुरवावयाचा त्या भांडवलाची उभारणी मात्र ठेवी अगर भाग या रूपानें या प्राथमिक संस्थांकडून अगर त्यांची वस्ती असलेल्या ग्रामप्रदेशांतून फारच अल्प प्रमाणात होऊं शकली. या वस्तुस्थितीमुळें प्रत्यक्ष परिस्थिती मात्र अशी निर्माण झाली कीं, ठेवी व भाग या रूपानें भरपूर भांडवल मात्र नागरी प्रदेशांतील जनतेनें सढळ हातानें पुरविलें व त्या भांडव-लाचा विनियोग प्राथमिक सहकारी सोसायट्यांचा आर्थिक संसार थाटण्याकडे झाला. सेंट्रल बँकांत दाखल झालेल्या भांडव-लाची अशाप्रकारें वस्तुस्थिति असली तरी आज सेंट्रल बँकांच्या कारभारांत मात्र ठेवीदार व भागीदार या वर्गाला वर्चस्व न मिळतां, ज्यांचा ठेव अगर भाग रूपानें बँकेच्या भांडवलांत म्हण-ण्यासारखा हिस्सा तर नाहींच परंतु उलटपक्षीं जे बँकेत जनतेच्या या भांडवलाचा पूर्णत्वानें उपभोग घेतात अशा बँकेच्या कर्जदार मंडळी-लाच या प्रकारच्या संस्थांचे कारभारांत वर्चस्व अलिखित कायद्यानें देण्यांत आलें. तात्त्विक दृष्टीनें व निःपक्षपातानें या परिस्थितीचा विचार केल्यास बँकांच्या भांडवलांत ज्यांचा हिस्सा अधिक त्यांना मात्र तिच्या कारभारांत प्रतिनिधित्व कमी, हें हक्काचें व्यस्त प्रमाण व कारभारांतील ही विसंगतता, व्यावहारिक दृष्टीनें विचार करणाऱ्या सर्वसामान्य इसमाच्या तात्काल नजरेस आल्यावांचून रहात नाहीं. मग त्यास ही वस्तुस्थिति अन्यायमूलक आहे असें वाटणें अगदीं स्वाभाविक आहे.

### या घटनेचा दुष्परिणाम

अशा परिस्थितींत मध्यवर्ती सहकारी बँकांच्या व्यवहारांत साहजिकपणें उत्पन्न होणारे घोटाळे अगर दुष्परिणाम कसे टाळावे यासंबंधीं जरूर तो विचार करणें हें सुज्ञांचें कर्तव्य असल्यानें अशा तऱ्हेच्या विसंगत घटनेस यापुढें तरी पायबंद घालणें फार जरूरीचें झालें आहे. मध्यवर्ती बँकांच्या कारभारांत कर्जदार वर्गाचें बहुमत झाल्यानें संस्थेवरील जबाबदारीची जाणीव ही त्यांस दुय्यम महत्वाची बाब वाटून मनुष्य स्वभावाप्रमाणें आपला स्वार्थ त्यांचे नजरेपुढें सदैव प्रामुख्यानें उभा राहतो व तो साध-ण्याकडे अनेक प्रसंगीं त्यांचें बरेचसें कर्तृत्व खर्ची पडतें असा अनुभव आहे. अशा प्रकारच्या कारभाराचें पर्यवसान संस्थेच्या जीवितावर येऊन ठेपतें, असे कांहीं ताजे दाखले आपल्या प्रांतांत तरी आज आहेत. तेव्हां अशा तऱ्हेच्या एकंदर वस्तुस्थितीचें निर्विकारपणें परिशीलन केल्यास हीच गोष्ट आपणांपुढें प्रामु-ख्यानें उभी राहतें कीं जो वर्ग कर्जदार या सदराखालीं राहून संस्थेचा शक्य तो फायदा आपले स्वतःचे कार्यासाठी करून घेतो त्या वर्गास यापुढें वाजवी तें प्रतिनिधित्व सेंट्रल बँकांचे कारभारांत जरूर राहावें, परंतु आज जें त्यांच्या हक्कांचें व हित-संबंधाचें फाजील स्तोम माजविण्यांत येत आहे त्या कारवाईस जरूर पायबंद घालण्यांत यावा; कारण तसें न झाल्यास पुढें अनवस्था प्रसंग उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं अशी धोक्याची सूचना कांहीं मध्यवर्ती बँकांचा ताजा इतिहास आप-णांस देत आहे.

### ह्या धर्मादायी संस्था नव्हत

सहकारी संस्था म्हटलया म्हणजे त्यांनीं आपल्या घटकांचें सुख व सोयहीं प्राधान्येंकरून, व त्या घटकासंबंधींच्या इतर अयोग्य बाबींकडे डोळेझांक करूनहि पाहिली पाहिजे असा सर्वसाधारण समज दृढमूल झालेला आपणांस आढळून येतो; इतकेंच नव्हे तर ज्या घटकांना या सहकार्याचा ओघ आपल्या स्वतःच्या आर्थिक हिताकडे वळवून घ्यावयाचा आहे त्यांचेकडून तर मध्यवर्ती बँकांच्या सहकारी स्वरूपालाच अवास्तव महत्व दिलें जातें. अशा प्रकारें स्वतःच्या स्वार्थी दृष्टीचा त्यांचा बँकां-संबंधींचा प्रचार इतक्या पराकोटीला जाऊं शकतो कीं ते मध्य-वर्ती बँका या "धर्मादायी संस्था" 'Charitable Institutions'च आहेत अशा प्रकारचा उघड उघड प्रचार करण्यास कचरत नाहींत. याचे उलट मात्र मोठमोठ्या कार्यकर्त्यां व नामवंत पुढा-ऱ्यांनीं व अधिकाऱ्यांनीं, मध्यवर्ती बँका आणि सर्व-साधारण सहकारी संस्था या प्रामुख्यानें व मूलतः "व्यापारी" व "व्यवहारी" संस्था आहेत या सूत्राची खुणगांठ आपले ठिकाणीं पक्की बांधली. त्यांचे व्यापारी व व्यवहारी व म्हणूनच हिशेबी व आर्थिक स्वरूपापासून या संस्थांतील कार्यकर्त्यांनीं केव्हांहि क्षणभर देखील पराङ्मुख होतां कामा नये असा स्पष्ट व निःसंदिग्ध इषारा हे पुढारी व अधिकारी आजपावेतों सातत्यानें

देत आलेले आहेत. आर्थिक संस्था उत्तम प्रकारें चालवावयाच्या म्हणजे आपणांस तदनुषंगिक व्यापारी धोरणच पूर्णत्वानें अवलंबिलें पाहिजे. तें धोरण शिथिल झालें अगर सुटलें तर निःसंशयपणें आर्थिक मोक्ष दुरावला वा फसला हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट व प्रकट असतांहि या अंगाकडे ज्याअर्थी दुर्लक्ष होतें त्याअर्थी एक तर तें सहेतुकपणें असलें पाहिजे किंवा तत्वपरिपालनाच्या मृगजलाच्या निरर्थक पाठलागाच्या धोरणानें तरी असलें पाहिजे. सांप्रतच्या व्यवहारी व भौतिक युगांत तत्व व व्यवहार यांची विसंगति होत असल्यास प्रत्यक्ष व्यवहार हेंच तत्व होऊन बसत आहे, असा अनुभव आपणांस येतो. पैशाच्या व्यवहाराचे कामीं तर तत्व बहुधा फारच लंगडें पडतें व त्यास सावरण्यासाठी व्यवहाराची मदत घ्यावी लागते असा हरघडी दाखला येतो. सेंट्रल बँकांचें व्यापारी, व्यवहारी व हिशेबी स्वरूप जर अबाधित राहिलें तरच त्या बँकांचा संसार सुखाचा होऊन त्यांचा परिवार ज्या सहकारी प्राथमिक सोसायट्या त्यांनाहि या संपन्न व सुखी संसाराचा साहजिक तो फायदा आपोआप, यथाक्रम व हळूहळू मिळून त्यांचेंहि पालन चांगल्या प्रकारें होईल. उलटपक्षीं, सेंट्रल बँकांना धर्मादायी संस्थांचें रूप दिलें तर व्यापारी धोरण व व्यवहार यापासून परावृत्त झाल्याचा कटु ठोकताळा असाच यावयाचा कीं हळूहळू परंतु निरपवादपणें शेत कुंपणाच्याच भक्ष्यस्थानीं पडून नामशेष होतें. आर्थिक व्यवहारांत अशा तऱ्हेचे अनुभव प्रत्यक्ष कार्यकर्त्यांना अनेकवार येऊन त्यांना ज्या अनुभवाच्या ठेंचा लागल्या आहेत त्यांवरून त्यांनीं योग्य तो बोध अवश्यमेव घेतला पाहिजे व तो इतरांवर ठसविण्याचा त्यांनीं छातीठोकपणानें प्रयत्न केला पाहिजे; असें केल्यानेंच त्यांचेकडून सहकारी चळवळीची खरी सेवा होऊन भरीव समाजकल्याण साधल्याचें श्रेय त्यांस मिळेल ही गोष्ट निःसंशय होय.

### सुचविलेली सुधारणा

वरील विवेचनावरून हल्ली सेंट्रल बँकांच्या घटनेमध्यें कर्जदार वर्गाचें जें अवास्तव वर्चस्व आहे तें योग्य त्या प्रमाणांत खाली उतरवून त्या जागीं संस्थेचें भांडवल उभारणींत ज्यांनीं सढळ हातानें, धोका पत्करूनहि मदत केली आहे त्यांना आज अपुरें असलेलें परंतु वाजवी तें प्रतिनिधित्व देण्याचा विचार गंभीरपणें करण्याची वेळ अद्याप आलेली नाहीं काय? असा आमचा सहकारी कार्यकर्त्यांपुढें प्रश्न आहे. सेंट्रल बँकांचा एकंदर व्यवहार उत्तम प्रकारें चालावा या उद्दिष्टानें तिच्या निरनिराळ्या घटकांना त्यांच्या त्यांच्या अवसानाप्रमाणें व महत्वाप्रमाणें संस्थेच्या अंतर्गत कारभारांत प्रतिनिधित्व येऊन तिच्या कारभाराची योजना करावी व संस्थेच्या निरनिराळ्या घटकांनींहि आपापली जबाबदारी व आपापलें अवसान यांची खुणगांठ आपापले मनाशीं नीटपणें बांधून संस्थेचा गाडा सुरळीतपणें चालविण्यास मनोभावें व प्रामाणिकपणें मदत करावी. यांतच सर्व सहकारी बांधवांचें अंतिम कल्याण आहे व हेंच खरें सहकार्य आहे असें आम्हांस स्पष्टपणें वाटतें.

---

### जागतिक उत्पादन आणि लोकसंख्या

मालाचें जागतिक उत्पादन गेल्या आठ वर्षांत हळूहळू वाढत आहे आणि त्याच्या एकूण किंमतींतही वाढ झाली आहे. त्याबरोबरच १९२९ ते १९३७ ह्या मुदतींत जगाची लोकसंख्या १३ टक्क्यांनीं वाढली आहे.


दि बँक
ऑफ
महाराष्ट्र लि.

लक्ष्मीरोड, पुणें, २.

अधिकृत भांडवल
१०,००,००० रु.
विक्रीस काढलेलें भांडवल
५,००,००० रु.
खपलेलें भांडवल
२,४४,६०० रु.
वसूल झालेलें भांडवल
१,२२,३०० रु.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात.
या बँकेवरील चेक मुंबईला
सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.
मार्फत
कमिशनशिवाय वसूल केले जातात.

बँकेचे नियम
व्याजाचे दर
व
शेअरबद्दल
बँकेकडे चौकशी करावी.

M. V. Gokhale,
मॅनेजर

## फॅशनला झिडकारून खरा माल ओळखून वापरा

(श्री. पोपटलाल छगनलाल शेट, व्यवस्थापक, श्री. ग्रामसेवा मंदिर, खेतवाडी, मेनरोड, मुंबई ४ ह्यांच्या मूळ गुजराथी लेखाचा अनुवाद)

जमीन नांगरून धान्य पिकविणारा शेतकरी हा देशाचें दारिद्र्य दूर करणारा देव. म्हणूनच त्याच्या धंद्याबाबत उत्तम शेती असें म्हणतात. सामान्य जनतेच्या जीवनाचीं मुख्य साधनें उत्पन्न करण्याच्या पुण्यकार्यांत शेतकरी गढून गेलेला असतो; आणि त्याच्या आधारानें चाललेल्या या संसारांत उपयुक्त वस्तूंचा देशभक्तीच्या भावनेनें उपयोग व्हावा म्हणून देशाला व समाजाला उपयोगी अशा वस्तूंचा संग्रह करणें आणि त्यांची विक्री करणें ह्याचें नांव व्यापार. म्हणूनच उत्तम शेती आणि नंतर मध्यम व्यापार गणला गेला.

सध्या ह्या पवित्र भावनेची ज्योत क्वचितच व्यापाऱ्यांच्या जीवनांमध्यें जागत असेल. कारण व्यापारीपद सध्या इंग्रज सरकाराच्या स्वाधीन आहे. आम्ही ह्या परतंत्र देशांत लोकांस फाडून खाणारे दलाल बनलों आहों.

केसांकरितां कोस्मेटिक, पेंट, पावडर, लोशन वगैरे परदेशी वस्तू आर्थिक व शारीरिक दृष्ट्या आपलें किती भयंकर नुकसान करतात ह्याची ह्या ठिकाणीं थोडक्यांत जाणीव करून देत आहें.

आपला आयुर्वेद हा अध्यात्म विद्येंतूनच जन्मला आहे. सध्याच्या आश्चर्यकारक वाटणाऱ्या युरोपियन औषधांत फक्त शारीरिक उपाधी बरे करण्याचे गुण असतील. परंतु आपल्या आयुर्वेदिक औषधांत तर शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक ह्या तिन्ही प्रकारचे रोग बरे करण्याचें चमत्कारिक सामर्थ्य आहे. परंतु पाश्चात्य आसुरी संस्कृतीच्या संगतींत आपल्या दैवी संस्कृतीचा आपणांत झालेला ऱ्हास आणि वाढतें शहरी जीवन या दोन दोषांमुळें आपण खऱ्या वस्तूंची किंमत करण्याचा विवेक गमावून बसलों. स्वस्त वनस्पतींच्या औषधांची ओळख आपणांस होत नाहीं. कारण, जाहिरातींत दिलेलीं मोठीं वर्णनें आणि आकर्षक व भपकेदार पॅकिंग या दोन्हीं गोष्टींच्या मागें जाऊन त्यांच्या वास्तविक गुणांची किंमत करण्याची विवेक शक्ति आपणांत फार थोडी आहे.

स्त्रिया, पुरुष आणि मुलें यांनीं डोक्यास तेल कशाकरितां लावावें व अंगास तेल कशाकरितां चोळावें हें सध्याचे शिकलेले लोक कोठून जाणणार? कारण, ब्रिटिश सरकारच्या शाळेंत शारंगधर अथवा रसोधारतंत्र ह्यांसारखीं आयुर्वेदिक पुस्तकें चालत नाहींत. तीं आमच्या शिक्षण संस्थांत शिकवलीं तर विलायती औषधांप्रीत्यर्थ परदेशांत चाललेले कोट्यवधि रुपये बाहेर न जातां आपल्या देशांतच रहातील.

सध्या बहुतेक सर्व लोक वास, रंग व भपका पाहून तेलें खरेदी करितात आणि मजेखातर डोक्यास लावतात. परंतु आयुर्वेद दांत तर केस तुळतुळीत व मेंदू तरतरीत आणि त्याचप्रमाणें शरीर सुंदर रहावें याकरितां तेलें डोक्यास लाविणें व शरीरास चोळणें ह्या विषयीं माहिती दिली आहे आणि हीं तेलें अनेक वनस्पतींपासून चांगल्यांत चांगलीं फायदेशीर कशीं करावीं याबद्दल प्रयोग सांगितले आहेत. सध्या वापरण्यांत येणारीं केवळ भपकेदार (विशेषतः विलायती) तेलें, पोमेड वगैरे आपल्या शरीरास हानीकारक असून खर्च वाढवून देशास कंगाल करणारीं तीं साधनें आहेत. त्यांतहि आपल्या देशांतील बायका फॅशनमुळें निष्कारण संकटांत पडतात. उदाहरणार्थ, कॉस्मेटिक, पेंट, पॉवडर, लोशन वगैरे पदार्थ अंगास व केसास लावण्यांत येतात, त्यांतले कित्येक आपत्तीकारक आहेत असें एका इंग्रज डॉक्टरानें प्रसिद्ध केलें आहे, तरीहि अद्याप स्वराज्य मागणारा आपला देश डोळे उघडीत नाहीं.

अमेरिकन मेडिकल असोसिएशनच्या एका वर्तमानपत्रांत क्लिव्हलंडचे महाशय डॉक्टर कोले यांनीं एक महत्त्वाची गोष्ट लिहून फॅशनमध्यें मरत असलेल्या सर्व जगांतील स्त्रियांची बहुमोल सेवा केली आहे. डॉ. कोले यांच्या स्वतःच्या एका स्त्री रोग्यास शिशाच्या प्रखर विषाची बाधा झाली. ते म्हणतात कीं, तिला डोक्याच्या केसांस लावण्याच्या लोशननें विषबाधा झाली. त्या लोशनचें पृथःकरण करतां त्यांत २३ टक्के लेड ॲसेटेट होतें. ॲसेटिक ॲसिडमधून झालेल्या क्षारास ॲसेटेट या नांवानें ओळखण्यांत येतें. या पद्धतीचे कॉस्मेटिक, लोशन, क्रीम, पेंट व पावडर वगैरे पदार्थ यांमुळें मज्जातंतूच्या रोगांसारखे विकार उत्पन्न झाल्याचीं असंख्य उदाहरणें डॉक्टरांच्या पहाण्यांत आहेत. कित्येक क्रीम्स, कोस्मेटिक, लोशन, वगैरे कातडींत मुरतांच त्या योगानें कांहींजणांस फेफऱ्याची व्यथा जडल्याचीं उदाहरणें आहेत. कित्येकांचें डोळ्यांचें नुकसान झालें आहे तर कित्येकांना विषबाधा होऊन मरण आलेलें आहे.

वरील विवेचनाचें मनन करा आणि उद्‍भवणारे रोग व होणारी दुर्दशा यांचा विचार करून फॅशनच्या आपत्तींतून स्वतःचा बचाव करा. आपल्या आयुर्वेदास ओळखा आणि देशी पद्धतीनें बनविलेल्या सुंदर, गुणकारी, आणि स्वस्त वस्तु खरेदी करण्याचा विवेक ठेवा. दिवाळीच्या शुभ प्रसंगाचे निमित्तानें हें सांगणें उपयोगी पडेल असें समजून माझ्या देशबांधवांस ही नम्र विनंती करीत आहे. आमचे व्यापारी बंधूहि अनेक देशी सुंदर व चांगल्या वस्तू विकण्याचा निर्धार करतील अशी आशा आहे.

(मूळ गुजराथी लेखाचे अनुवादकः श्री. म. गो. कुलकर्णी)

स्वदेशी वस्तूच वापरा.
स्वदेशी भंडार मध्यें प्रत्येक गृहोपयोगी जिन्नस संपूर्ण स्वदेशी मिळतो.
लक्ष्मीरोड, सेंट्रल बँक बिल्डिंग, पुणें २.

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक. लि. चा

नवीन उपक्रम

# सेफ डिपॉझिट व्हॉल्ट

थोड्या मोबदल्यांत मौल्यवान जिनसा सुरक्षितपणें ठेवतां येतात. एकवार समक्ष भेट द्यावी अशी विनंति आहे.

सेफ कस्टडीसाठी सीलबंद पेट्याही माफक दरानें घेतल्या जातात.

तसेंच सभासदांना घरांचे तारणावर थोड्या व लांब मुदतीचीं कर्जे माफक व्याजानें दिलीं जातात. सोन्या-चांदीचे जिनसांचे तारणावरही माफक व्याजानें कर्जे दिलीं जातात. याशिवाय इतर सर्व बँकिंगचे व्यवहार केले जातात.

**जास्त माहिती पाहिजे असल्यास लिहा अगर भेटा.**

द. दि. चितळे.

मॅनेजिंग डायरेक्टर.



३० वर्षांच्या अनुभवी ( लंडन डिप्लोमा होल्डर्स )

## ' पराडकर टेलर्स कटिंग ॲकॅडमी ' मध्यें

( सिटी पोस्टासमोर, बुधवार, पुणें २ )

शिवणकलेचें शास्त्रोक्त शिक्षण घ्या आणि धंदा चालविण्यास समर्थ करणारें सर्टिफिकेट मिळवा. कारण येथील शिक्षण थोड्या खर्चांत व थोड्या वेळांत माहितीपूर्ण दिलें जातें. पोस्टानें शिक्षण देण्याची सोय केली आहे.

मुंबई व बडोदें सरकारनें मंजूर केलेलें

भाग १-२-३ ) **शिवणकला-शिक्षक** ( आवृत्ति ५ वी

( लेखक—आर. एन. पराडकर, लंडन डिप्लोमा होल्डर )

५०० पानें, ५०० आकृत्या, सर्व नव्हेच्या कपड्यांची संपूर्ण माहिती, किंमत व्ही. पी. सह ६॥ रु. **शिवणकला प्रवेश व वस्त्रमापन** किंमत व्ही. पी. सह अनुक्रमें १२ आणे व १४ आणे तीनही पुस्तकें एकदम घेणारांस व्ही. पी. सह किंमत ७॥ रु

विशेष माहितीसाठीं माहितीपत्रक मागवा अगर वरील पत्त्यावर भेटा !



प्रो. महादेव गोविंद कुलकर्णी, मंडई

तेल व किराणा दुकान

कस्तुरे चौक, सदाशिव पेठ, पुणें नं. २

एजंट




मुंबईना स्टोकिस्ट

मेसर्स विठ्ठलदास नारायणदासनी कं.

जुम्मा मशीद मुंबई

## पुण्यांत सुशिक्षित व पदवीधर माणसांनीं चालवलेला अभिनव उपक्रम

(लि. आ. म.)

पुणे शहरांतील सदाशिव पेठेचे हौदाजवळच टेलर्स रिसबूड ब्रदर्स या नांवाचें दुकान आपणांस गेल्या १९३७ चे जानेवारी-पासून सुरु असलेलें आढळून येईल. त्या दुकानाचे चालकांपैकीं एक चालक मुंबई युनिव्हर्सिटीचे पदवीधर असून ते स्वतः त्यांत काम करतात हें पुष्कळांना ठाऊकहि असेल. पदवीधर मनुष्य अशा धंद्यांत काम करतो ही गोष्ट अद्याप आपलेकडे अभूतपूर्वच म्हणण्यास हरकत नाहीं.

असल्या धंद्यांत सुशिक्षितांनीं व त्यांतही पदवीधर माणसांनीं पडणें म्हणजे जुन्या परंपरेला धक्का दिल्याप्रमाणेंच आहे. पण बदलत्या काळाप्रमाणें धर्म बदलतो त्याप्रमाणें कोणत्याहि धंद्याला सचोटी व प्रामाणिकपणा यांखेरीज सुशिक्षित माणसांचीही अत्यंत आवश्यकता असणें हेंहि क्रमप्राप्तच झालें आहे व त्याकरतां अशीं माणसें या धंद्यांत पडल्यावर त्या धंद्याला उर्जितावस्था येण्यास फारसा वेळ लागत नाहीं हें आपणांस वरील दुकानाची प्रगति पाहिल्यास आढळून येईल.


अलीकडे बऱ्याच सुशिक्षितांचा कल या धंद्यांत पडण्याकडे असतो पण नवीन माणसांकडून चुका होणें अपरिहार्य असतें व त्यामुळें हल्लीच्या धकाधकीच्या चढाओढींत त्यास डोकें वर काढणें अशक्य होऊन बसतें. पण अशा नवीन माणसांच्या चुका होण्यापूर्वीच त्यांस इशारा देणारीं मार्गदर्शक माणसें असलीं म्हणजे कोणत्याहि बिकट चढाओढींत त्यांना यशस्वी रीतीनें टक्कर देतां देऊन आपलें डोकें वर काढतां येतें व ही गोष्ट रिसबूड बंधूंनीं सिद्ध करून दिली आहे.

याचें सर्व श्रेय रिसबूडबंधूंचे पाठीमागें असलेले त्यांचे परमपूज्य वडील रा. मामासाहेब रिसबूड यांजकडेच आहे. रा. मामासाहेब हे मॅट्रिक पास झाल्यानंतर शाळाखात्यांत मास्तर म्हणून त्यांनीं नोकरी धरली होती व त्या काळीं नोकरी मिळवली कीं आपली इतिकर्तव्यता झाली असें समजलें जात असे. पण नोकरी करण्यानें फक्त आपल्या स्वतःचाच पोटापाण्याचा प्रश्न सोडवणें सुलभ होतें व इतर आपले नातेवाईक व आपणांवर अवलंबून असणारी मंडळी यांचे पोटाचा प्रश्न नोकरीनें सुटत नाहीं. त्याकरतां एखाद्या धंद्याचाच आश्रय केला पाहिजे. हें जाणून त्यांनीं शिवणकाम शिकण्यास सुरवात केली व पुढें नोकरीचा राजीनामा देऊन शिवण कामाचें दुकान मुंबईंत थाटलें. आज त्यांचे बरोबरीचे पुष्कळ लोक पेन्शन घेऊन आपला काळ विश्रांतींत घालवीत आहेत; पण रा. मामासाहेबांनीं १९०९ सालीं मुंबईस दुकान चालू केल्यापासून त्यांचे शेंकडो शिष्य फक्त पुण्या-मुंबईंतच नव्हे तर द्वारकेपर्यंतही शिवण कामाचीं दुकानें यशस्वी रीतीनें चालवीत आहेत. मुंबईस दत्तात्रय दांडेकर कंपनी म्हणून पुष्कळांचे माहितींत असणें शक्य आहे व ती कंपनी १९०९ सालापासून आजपर्यंत अव्याहत चाललेली आपणांस आढळून येईल. तिचें सर्व श्रेय रा. मामासाहेब यांसच आहे. रा. मामासाहेब यांनीं ही आपली विचारसरणी फक्त आपले पुरतीच अमलांत न आणतां आपले मुलांचे मनावरही चांगलीच बिंबवली व त्यामुळेंच रिसबूड बंधू हे एके ठिकाणीं राहून आज पुण्यांत दुकान चालवून भरभराटीस आणीत आहेत. त्यांचे चिरंजीव महादेव रिसबूड यांनींहि आपले वडलांप्रमाणेंच नोकरीचा आकुंचित राजमार्ग सोडून धंद्याचा स्वतंत्र पण खडतर मार्ग स्वीकारला आहे.

गिऱ्हाईकांची आवड पूर्ण करणें हें एकच ध्येय रिसबूड बंधूंनीं आपले पुढें ठेवल्यामुळें व त्याकरतां कितीहि कष्ट पडले तरी ते करण्याची त्यांची तयारी असलेमुळें त्यांना यश येण्यास फारसा वेळ लागणार नाहीं अशी आशा करण्यास काय हरकत आहे ?


दि ट्रस्ट ऑफ इंडिया

ॲश्यु. कं. लि. पुणें




जीवन व औद्योगिक विम्याचें काम करणारी नामवंत कंपनी.

मुख्य कचेरी : ६ बुधवार पुणें. शाखा व उपशाखा : मुंबई, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर, बेळगांव.

## बँकिंगच्या धंद्यांत आवश्यक असलेले गुण

लेखकः– " अनुभवी "

बँकिंगचा धंदा आपल्या देशांत अगदींच नवा नसला, तरी ज्या प्रमाणांत व ज्या प्रकारें तो इतर सुधारलेल्या देशांत आज केला जात आहे त्या दृष्टींनीं तो आपणांस नवाच आहे. आपल्या देशांत या धंद्याला अजून पुष्कळ वाव आहे व अर्थातच त्यांत पडणाऱ्या व्यक्तींना आपली कर्तृत्वशक्ति व कौशल्य यांचा उपयोग करण्यास पुष्कळच संधी मिळण्यासारखी आहे ही गोष्ट आंकड्यांनीं सिद्ध करण्याचें कारण नाहीं. कर्तृत्ववान व लायक मनुष्याची या धंद्यांत नेहमींच जरूरी आहे व त्यांत पडून उत्तम समाजोपयोगी कार्य करून लोकांत मानमान्यता मिळविण्यास त्यांस भरपूर अवसर आहे. मुलगा बुद्धीनें जड अगर वागणुकीनें उनाड असला म्हणजेच त्यास बँकेच्या अगर इतर व्यापारी धंद्यांत घालण्याचें व तो हुशार व उद्योगी असल्यास वकीली, डॉक्टरी अगर इतर प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या धंद्यांत घालावयाचें अशी पालकांची प्रवृत्ति असण्याचे दिवस आतां राहिले नाहींत. इतर प्रतिष्ठित धंद्यांप्रमाणेंच ह्या धंद्यांत पडण्यांत कोणताहि कमीपणा अगर हलकेपणा नाहीं. कर्तृत्ववान तरुणास इतर कोणत्याहि धंद्याप्रमाणें पुढें येण्यास याहि धंद्यांत वाव आहे. किंबहुना इतर कित्येक धंद्यांपेक्षा आपलें कर्तृत्व दाखविण्यास जास्त सोयीचा व खात्रीचा असा धंदा आहे. हेंहि येथें सांगणें आवश्यक आहे का बुद्धी, हुशारी व पूर्वतयारी ह्यांवाचून बँकिंगच्या उद्योगांत कोणासहि शिरतां येणार नाहीं. त्यांत कमीपणा तर नाहींच, पण विशेष लायकीची जरूर असते. ह्या धंद्यांतली गैरसोयीची किंवा अप्रिय वाटणारी गोष्ट एवढीच कीं वकीली किंवा डॉक्टरी या धंद्यांत ज्याप्रमाणें परीक्षा पास होतांच, धंदा कसाहि चालला तरी समाजांत सुप्रतिष्ठितपणें वावरतां येतें त्याप्रमाणें त्यांत नसून उलट या व्यवसायांत पहिला पुष्कळसा काळ उमेद्वारींत व मामुली कामें करण्यांतच घालवावा लागतो. हा धंदा व्यावहारिक माहितीचा व जबाबदारीचा असल्यानें असें होणें अपरिहार्य आहे.

सुदैवानें या धंद्यांत पडणारांस त्याचें पुस्तकी ज्ञान व शिक्षण मिळविण्याचीं पुष्कळ साधनें आपल्या देशांत आज उपलब्ध झालेलीं आहेत व होत आहेत. पुस्तकी ज्ञानापेक्षा व्यावहारिक माहिती या धंद्यास विशेष लागते हें खरें असलें तरी पुस्तकी म्हणजे तात्त्विक ज्ञानाचीहि त्यास आवश्यकता आहे ही गोष्टहि विसरून चालणार नाहीं. पुस्तकी व प्रत्यक्ष ज्ञानाच्या भांडवलाप्रमाणेंच बँकरला उत्तम प्रकारचें शील, सचोटी व कष्टाळूपणा ह्या गुणांची अत्यंत आवश्यकता आहे. सुस्वभाव, विश्वासूपणा व कामांतील तत्परता ह्याबरोबरच व्यवहारांतील व वैय्यक्तिक रहाणींतील नीटनेटकेपणा या गुणांसहि महत्व आहे.

या धंद्यांत पडणारानें आपल्या वांट्यास कोणतेंहि व कसलेंहि काम आलें असलें तरी तें नीट समजूत घेऊन शक्य तों लवकर व सफाईनें करण्याची संवय ठेवली पाहिजे. काम करतांना मिळालेल्या पुस्तकी ज्ञानाचा त्याशीं मेळ कसा बसतो हें पहाण्याचा प्रयत्न त्यानें केला पाहिजे. हाताखालचे व बरोबरीचे सहकारी, वरिष्ठ अधिकारी व गिऱ्हाईक यांच्याशीं योग्य प्रकारें वागण्याची व कोणीहि आपल्या वागण्यानें दुखविलें जाणार नाहीं याची नेहमीं खबरदारी घेतली पाहिजे. मनमिळाऊ स्वभावानें पुष्कळ


'अभिनंदनीय प्रगति' असेच बोल नाशिकच्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधि व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वीं आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.
लिहा अगर भेटा. | मॅनेजिंग डायरेक्टर

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

अप-टु-डेट शिलाई करतां
माहिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा
बुधवार चौक, पुणें ] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ खादी भांडाराचे माडीवर



अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

For All Medicinal Requisites
— TRY —
N. MAHADEV & Co.
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner POONA, 2.

गोष्टी चांगल्या तऱ्हेनें करतां येतात. इतर आवश्यक सर्व गुण भरपूर प्रमाणांत असले तरी नुसत्या स्वभावदोषांमुळें मनुष्याच्या उत्कर्षाची गति कुंठित होते हा अनुभव पुष्कळांचे बाबतींत पदोपदीं येतो. धंद्यांत पडण्याच्या सुरवातीचा कांहीं काळ अभ्यास व परीक्षा ह्यांपेक्षा आपलें काम आत्मसात करण्यांत घालविल्यास जास्त फायदेशीर होतें. सर्वसाधारण व्यापार, उद्योगधंदे अगर बँकिंग ह्यांमध्यें पडलेल्यांस टाइपिंग व लघुलिपी या कलांच्या ज्ञानाची अत्यंत आवश्यकता आहे. 'निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्ट' व 'कंपनीज ॲक्ट' यांच्यासारखे कायदे (ज्यांचेवर बँकिंगचे पुष्कळसे व्यवहार अवलंबून असतात) त्यांचा चांगला अभ्यास असला पाहिजे व नेहमींच्या आपल्या कामांत त्यांतील कोणकोणत्या कलमांचा संबंध येतो तें पहाण्याची संवय ठेवली पाहिजे. तसेंच पत्रव्यवहार वगैरे करण्यास इंग्रजी व देशी भाषा यांवर प्रभुत्व असणें आवश्यक आहे. पुष्कळ गोष्टी येत असूनहि त्या स्पष्ट, मुद्देसूद व आकर्षक भाषेंत लिहितां अगर बोलतां न आल्यानें काम योग्य प्रकारें होत नाहीं. रोज चांगलीं वर्तमानपत्रें विशेषतः त्यांतील व्यापारी व बँकिंगसंबंधाच्या बातम्या व लेख, तसेंच बँकिंगसंबंधीं खास नियतकालिकें जितकीं मिळतील तितकीं वाचण्याचा परिपाठ ठेवला पाहिजे. परदेशी हुंडणावळ, अकौन्टन्सी, चलन व अर्थशास्त्र यांचीहि माहिती आवश्यक आहे. अशा रीतीनें आपल्या व्यवसायांत यश मिळविण्यास सर्वतोपरी झटत राहिल्यास महत्त्वाकांक्षेप्रमाणें धंद्यांतील उच्च दर्जा मिळवण्याची व संभाळण्याची लायकी प्राप्त होईल व आलेली संधी गमावण्याचा प्रसंग येणार नाहीं.

ह्या धंद्यांत उच्च पदावर चढूं पहाणारांस व चढलेल्यांस अचुक निर्णयशक्ति, सुस्वभाव व व्यवहारचातुर्य यांची अत्यंत आवश्यकता आहे. सन्माननीय मार्गानें नवीन नवीन कामें मिळविण्याची कला अवगत असली पाहिजे. जरूर तेव्हां निःसंदिग्धपणें पण सौजन्यपूर्वक "नाहीं" म्हणण्याचें धारिष्ट्य पाहिजे व भांडखोर, मूर्ख अगर अतिशिष्ट लोकांपाशींहि धिम्मेपणानें वागण्याचें कौशल्य पाहिजे, कारण धंद्यांतील मनुष्याचा अशा लोकांशीं संबंध हा यावयाचाच.

### आर्थिक स्वावलंबनाचा कळस

जरूरीच्या जिनसा परदेशांतून आणाव्या लागूं नयेत म्हणून जर्मन राष्ट्र स्वावलंबी होण्याची पराकाष्ठा करीत आहे. खाण्याच्या जिनसांपैकीं निम्मे आणि कपडे, घरगुती उपयोगाचें सामान इत्यादि पैकीं ९० टक्के इतके जिन्नस कृत्रिम मालापासून तेथें तयार करण्यांत येतात. ह्या आकड्यांत अतिशयोक्ति असली तरी त्यावरून आर्थिक स्वावलंबनाचे प्रयत्न कोणत्या थराला गेले आहेत, ह्याची कल्पना येते.

### जपानमध्यें मोटारींचें उत्पादन

जपानमध्यें १९२३ सालापर्यंत कोणत्याही एका वर्षी मोटारींच्या उत्पादनाचा आकडा पन्नासावर गेला नाहीं. १९२१ सालीं केवळ २८ मोटारींचें उत्पादन झालें आणि १९२२ सालीं एकहि मोटार तयार झाली नाहीं. १९२३ सालीं ५ मोटारी बनविण्यांत आल्या; १९२४ सालीं १३६ मोटारींचें उत्पादन झालें. त्यानंतर उत्पादनाचा आंकडा हळुहळु वाढत जाऊन १९३१ सालीं ४३४ मोटारी तयार झाल्या. १९३६ सालांतील उत्पादन ८½ हजारांवर झालें!

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ५ आ. १० पै व्याजाचा दर

गेल्या आठवड्याचे अखेर हिंदुस्थान सरकारचीं ३ कोटि रुपये किंमतीचीं ट्रेझरी बिलें विकण्यांत आलीं. त्यांवर द. सा. द. शे. १ रु. ५ आ. १० पै इतका व्याजाचा दर पडला.

सर्वांगीण प्रगति
सन १९३७ भक्कम भरभराटीचें वर्ष
वेस्टर्न इंडिया
लाईफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड
सातारा शहर

१९३८ अखेर
आठवें मूल्यमापन
आणि
रौप्य महोत्सव

त्रैवार्षिक बोनस
हयातीनंतर रु. ७५ आणि हयातींतील रु. ६०
कोणत्याही दृष्टीनें पहा
वेस्टर्न इंडिया ठसठशीतपणें डोळ्यांत भरेल.
पुणें शाखा : : लक्ष्मी रोड, पुणें.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.
पूना गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें
हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

## सहकार-संदेश

(श्री. अ. के. प्रधान, ऑडिटर, को ऑपरेटिव्ह सोसायटीज्, सोलापूर)

सुख, संपत्ति व नीति यांच्या वाढीसाठी सहकारिता जन्मास आली आहे मनुष्य जातीची सेवा हा तिचा आत्मा आहे. सहकारिता जात, धर्म, देश, असले किरकोळ भेद मानीत नाहीं; कारण ती विश्वव्यापी आहे. सहकारिता ही एक सात्विक शक्ति आहे आणि सेवा हें तिचें ध्येय आहे. या शक्तीचा उपयोग जितका शास्त्रशुद्ध व जितका जास्त होईल तितकी जास्त भर मानवी सुख, संपत्ति व नीति यांत पडेल. एखाद्या सहकारी संस्थेंत दोष असेल, पण सहकारिता स्वतः दोषातीत आहे. सहकारिता तत्त्वनिष्ठ असावी; व्यक्तिनिष्ठ असूं नये. कारण व्यक्तिनिष्ठेचें रूपांतर हळू हळू दुफळींत होतें. दुफळी ही सहकारितेच्या मुळास लागलेली कीड होय. या दुफळीमुळें सहकारितेची वाढ खुंटून ज्याकरितां आमची रात्रंदिवस धडपड चालू असते तें सुख व ती संपत्ति आमच्यापासून दूर दूर जाते म्हणून आपसांतील दुफळी नाहींशी करण्याचा या शुभदिवशीं आपण निश्चय करूं या.

---

### रविवार पेठ सहकारी पतपेढी अन्‌लि. कोल्हापूर

वरील पतपेढीची चौदावी वार्षिक साधारण सभा ता. २५-९-३८ रोजीं श्री. डी. बी. माळी, बी. ए., एलएल. बी., ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. पुढील वर्षाकरितां श्री. डी. बी. माळी, श्री. य. आ. सोनटक्के, श्री. आ. य. लिंबेकर, श्री. रा. ब. घोडके, आणि श्री. तु. ब. माळी ह्यांची व्यवस्थापक मंडळावर निवडणूक झाली. श्री. द. कु. चव्हाण हे ऑडिटर निवडले गेले. सोसायटीकरितां स्वतःच्या मालकीची जागा घेऊन त्यावर इमारत बांधण्यासाठी रजिस्ट्रारांची परवानगी मागण्याचें ठरलें. सोसायटीच्या पटावर २३९ सभासद असून त्यांपैकीं १८८ सभासदांच्या मिळून सोसायटीकडे १६ हजार रुपयांच्या ठेवी आहेत. बिगर-सभासद ठेवीदारांच्या ठेवींची रकम १२½ हजार रुपये आहे. सालअखेर सभासदांकडे ३६ हजार रुपये येणें आहे. २९ इसमांकडे ४,३११ रुपये बाकी थकलेली आहे. वर्षअखेर बँकेस १,३१८ रुपये नफा झाला, त्यांपैकीं १७५ रुपये धर्मादायासाठीं राखून बाकी रकम १,१४३ रुपये रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आली. म्हणजे, एकूण रिझर्व्ह आतां ६,११२ रुपये झाला. इमारत फंडांत १,८७० रुपये आहेत.

---

### खेड व जुन्नर ता. को. सुपरवायझिंग युनियन लि.

वरील युनियनची वार्षिक साधारण सभा ता. २९-९-३८ रोजीं होऊन सन १९३७-३८ सालाबद्दलचा अहवाल, ताळेबंद, तपासणी यादी व त्यावरील खुलासा, सुधारलेले पोटनियम दुरुस्ती याबद्दलचा विचार होऊन त्यांस मंजुरी देण्यांत आली. पुणें सेंट्रल को. बँकेनें सोसायट्यांचे कर्जावरील व्याजाचा दर ५ टक्के करून वक्तशीर कर्जफेड करणाऱ्या शेतकी सोसायट्यांस कायम स्वरूपाचा १ टक्का रिबेट द्यावा अशी शिफारस सभेनें केली. शेतकरी लोकांना नेहमीं कमी व्याजाचे दरानें कर्ज मिळावें म्हणून सेंट्रल बँकांना ४ टक्के दरानें सोसायट्यांना कर्ज देतां यावें या दृष्टीनें तजवीज करून सरकारनें रिझर्व्ह बँकेमार्फत अगर अन्य तऱ्हेनें भांडवल पुरवावें अशा आशयाची योजना आंखणेबद्दल सरकारला विनंति करणेचें ठरलें. स्टँप ड्यूटी, रजिस्ट्रेशन फी, मनीआर्डर कमिशन रिबेट वगैरेसारख्या शेतकी सोसायट्यांना चालू असलेल्या सवलती सरकारनें परत न घेतां त्या तशाच चालू ठेवाव्या अशीही सरकारास विनंति करणेचें ठरलें.

---


हरतऱ्हेच्या रेशमी कापडांत श्रीराम सिल्कचा हात कोणीच धरूं शकत नाहीं.

श्रीराम सिल्क थ्रोइंग फॅक्टरीचीं छापील रेशमी पातळें म्हणजे स्त्रियांच्या पेहेरावांत एक नवीन टूम आहे. हीं पातळें वेलपत्तीचीं नक्षीदार आणि निसर्गाच्या विविध रंगांप्रमाणें मोहक, रंगदार असून आधुनिक रुचीला सर्वस्वी प्रिय होतील.

म्हैसूर वगैरे कच्च्या रेशमापासून तयार झालेले ताण्याबाण्याचें पक्क्या रंगाचें रेशीम, हातमाग व पॉवरलूमवर विणण्यास तयार ताण्या आणि हल्लींच्या मिलसच्या सुती पातळांना लागणारे पदराचें रेशीमही मिळतें. भाव व नमुने मागवा. आमच्याकडे एम्ब्रॉयडरी रेशीम मिळतें.

श्रीराम सिल्क थ्रोइंग फॅक्टरीचा सर्व रेशमी माल म्हैसूरच्या रेशमाचाच असतो.

गिऱ्हाइकांच्या आवडीप्रमाणें गर्भरेशमी लुगडींही मिळतात. जरीचा वाण हवा त्या नमुन्याचा मिळतो. पुरुषांना उपयुक्त अशीं रेशमी उपरणीं, जनानी व मर्दानी कद, ब्लाऊज् पीसेस, साधे रेशमी किंवा जरीचे खण, मुकटे शर्टिंग इ. हरतऱ्हेचा रेशमी माल मिळतो.

श्रीराम सिल्क थ्रोइंग फॅक्टरी
पो. बसवनगुडी बंगरूळ
पुणें शाखाः—महाराष्ट्र एजन्सी,
गवत्या मारुतीसमोर, बुधवार पुणें.



सर्व लोक पूना होजिअरीच पसंत करतात.

अंडरवेअर्स, गंजीफ्रॉक्स, स्वेटर्स, ड्रॉअर्स, चड्ड्या, स्कार्फस, स्लिपओव्हर्स, पुलोव्हर्स, सॉक्स, होजेस वगैरे सुती, मरसराइज्ड, लोकरी इत्यादि प्रकारचा कोणताही होजिअरी माल कोणत्याही दुकानदाराकडे खरेदी करतांना

पुणें येथील

दि सदर्न निटिंग वर्क्स, लिमिटेड

या कारखान्यांत तयार झालेली पूना होजिअरीच मागा.

---

दि सदर्न निटिंग वर्क्स लिमिटेड, पुणें,
२६४ शनवार पेठ, पुणें नं. २.



K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

# दि प्रॉव्हिन्शिअल बँक ऑफ अिण्डिया लि.

## स्थापना १९३६

मुख्य कार्यालय : २२ । अ, हॉस्पिटल रोड, ( सी. ॲण्ड. अेम् स्टेशन ) बंगळूर

शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष : **खानसाहेब हाजी अहमद कासम**, अेम. अेल. सी. मॅ. डिरेक्टर : **अेस. पी. ठाकर**

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस :** १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दर शेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस :** ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयांपर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी :** दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधींची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात. सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

**एम्. मोहन, एजंट,**
१७ मेनस्ट्रीट पुणें.

**एच. जी. गद्रे, एजंट.**
लक्ष्मीरोड, पुणें २.



# सारस्वत को-ऑपरेटिव बँक, लिमिटेड.

## ( स्थापना १९१८ )

**मुदतीच्या ठेवी**—रु. १०० अगर अधिक रकमांच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. बारा महिने मुदतीच्या ठेवीवर सभासदांना द. सा. दर शेंकडा ३ व इतरांना २॥ प्रमाणें व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट**—ह्या खात्यांत रु. ५ पासून रु. ५००० पर्यंत ठेवी स्वीकारल्या जातात. सभासदांना द. सा. दर शेंकडा २॥ प्रमाणें व इतरांना २ प्रमाणें व्याज दिलें जातें. पैसे चेकांनीं काढण्याची सोय केली आहे.

**रिकरिंग डिपॉझिट**—दरमहा १ रु. प्रमाणें सतत २४ महिने पैसे भरल्यास दोन वर्षांचे अखेर रु. २५ दिले जातात, व वरीलप्रमाणें ४५ महिने भरल्यास ४८ महिन्यांच्या अखेरीस रु. ५० दिले जातात; म्हणजे व्याज सुमारें ५ टक्के पडतें.

**करंट अकाउन्ट**—दररोजच्या बाकीवर रु. ५० पासून २५,००० पर्यंत सभासदांना १॥ व इतरांना १ टक्का व्याज दिलें जातें. या खात्याबाबत अधिक माहिती ऑफिसांत मिळेल.

**परगांवच्या हुंड्या**—मुंबई इलाख्यांतील सर्व मुख्य शहरांतील हुंड्या, रेल्वेरसीट वगैरे वसुलीचें काम माफक कमिशन घेऊन केलें जातें. त्याप्रमाणेंच कोणत्याही मुख्य शहरीं पैसे ड्राफ्टनीं पाठविण्याची व्यवस्था केली जाते.

**खरेदी-विक्री खातें**—शेअर व सरकारी रोखे खरेदीविक्रीचें काम माफक कमिशन घेऊन केलें जातें.

**कामाच्या वेळा**—लोकांच्या सोईसाठीं सकाळीं व संध्याकाळीं ठेवण्यांत आल्या आहेत.

विशेष माहिती बँकेच्या ऑफिसांत मिळेल.

| | | |
|---|---|---|
| मुख्य कचेरी—<br>२६४, चर्नीरोड, गिरगांव<br>मुंबई ४ | ठाकुरद्वार सब ऑफिस—<br>सिद्धारूढ प्रासाद<br>ठाकूरद्वार पोस्टानजीक<br>२६४ गिरगांव, मुंबई २ | दादर सब ऑफिस—<br>भिस्मिल्ला बिल्डिंग<br>रानडे रोड, बी. बी. सी. आय.<br>रेल्वेच्या दादर स्टेशन समोर |

## पथिकाश्रमाची पूर्वपीठिका.

( लेखकः—न. दा. सरपोतदार, सिनेआर्टिस्ट, पुणें. )

प्रवाशांना उतरण्यासाठी बांधलेली निवाऱ्याची जागा, तो पथिकाश्रम असा पूर्वीच्या पाहुणेगृहांचा सरळ अर्थ करतां येईल. हल्लींचें 'गेस्टहाऊस' व 'लॉज' यांचाही तोच अर्थ होतो. प्राचीन काळीं पथिकाश्रम, पाणपोई व अन्नछत्रें या संस्था प्रवाशांच्या खास सोईसाठी भारतीय आर्यांनीं निर्माण केल्या होत्या. तीच परंपरा अद्यापहि कुठें कुठें चालू आहे. प्रजेच्या गैरसोयी दूर करणें, हें राजाचें कर्तव्य मानलें जात होतें, त्या वेळीं ह्या सर्व सोई राजाच करीत असे. पण कालांतरानें राजे आपल्या कार्यांत कुचराई करूं लागले, किंवा त्यांना करांच्या उत्पन्नांतून अशा संस्था मुबलक निर्माण करणें अशक्य झालें, तेव्हां तत्कालीन मोठमोठ्या धनिक लोकांना अन्नछत्रें, धर्मशाळा वगैरे काढण्याच्या कामीं, आपल्या दानधर्माचा उपयोग करावा असें वाटूं लागलें असावें. 'मराव परी कीर्तिरूपें उरावें' अशा महत्त्वाकांक्षेचे लोकहि, सर्वतोमुखीं आपलें नांव व्हावें म्हणून अशा संस्थांसाठी आपला पैसा खर्च करीत असत. इंदूरच्या देवी अहिल्याबाई होळकर व ग्वाल्हेरच्या बायजाबाई शिंदे यांचीं नाशिक, पंढरपूर, काशी व रामेश्वर येथील अन्नछत्रें हीं जशीं राजेलोकांच्या दानधर्माचीं ऐतिहासिक उदाहरणें दाखवितां येतील, तशींच, नाशिक, पंढरपूर, देहू, आळंदी येथील गाडगेबुवांच्या धर्मशाळा किंवा प्रयाग, पशुपतेश्वर, बद्रिकेदार वगैरे ठिकाणच्या काळे कंबळीवाल्यांच्या चट्टी अथवा इंदूरचे शेट हुकुमचंद रायचंद यांच्या इंदूर उज्जयनीच्या सराया, या आजकालच्या धनिकांचीं दानधर्माचीं उदाहरणें म्हणून दाखवितां येतील. काशींत अशीं ३६० अन्नछत्रें आहेत म्हणतात! त्यांतील कांहीं राजेलोकांचीं तर कांहीं सरदार-जमीनदारांचीं व शेटसावकारांचींहि आहेत. तिरुपति, रामेश्वर, पाळणी, मदुरा, त्रिचनापल्ली, बेंगलोर, म्हैसूर, वगैरे ठिकाणींहि त्रावणकोर, कोचीन, म्हैसूर वगैरे संस्थानिकांच्या व चेटियार सावकारांच्या 'च्योलट्रीज' आहेत. कोठेंकोठें त्यांना 'छत्रम्' असेंहि म्हणतात. उत्तरेंतील व महाराष्ट्रांतील धर्मशाळांचें व अन्नछत्रांचेंच हें नांव असावें.

प्रवाशांना केवळ उतरण्यासाठी म्हणून ज्या इमारती बांधलेल्या आहेत, त्यांना मुख्यतः महाराष्ट्रांत 'धर्मशाळा' म्हणतात. अशा धर्मशाळा हिंदुस्थानांत साधारण गांवांतूनसुद्धा आहेत. ज्या ठिकाणीं त्या नसतात, त्या ठिकाणीं देवळांत अर्धा भाग याकामीं उपयोगांत आणला जातो. धर्मशाळा ह्या बहुधा जास्त रहदारी असलेल्या रस्त्यावरच्या गांवांतच असतात व अन्नछत्रें क्षेत्रांत व राजधानीच्या शहरीं किंवा इलाख्याचे गांवीं असतात. अन्नछत्रांत प्रवाशांचेसाठीं केवळ भोजनाचीच सोय असते, आणि ती सुद्धां दिवसांतून एकच वेळ, म्हणजे दुपारीं. त्याचप्रमाणें, एकाच अन्नछत्रांत एका माणसाला तीन दिवसांपेक्षा जास्त दिवस जेऊं घालीत नाहींत, असेंहि कोठें कोठें आहे. क्षेत्रांच्या ठिकाणचीं अन्नछत्रें मात्र या नियमाला अपवाद होत. अन्नछत्रांत फक्त जेवणाची सोय होते आणि राहण्याची सोय प्रवाशांना धर्मशाळेंत करून घ्यावी लागते. उत्तर हिंदुस्थानच्या सराया राजवाड्यांप्रमाणें भव्य असून राजापासून रंकापर्यंत सर्वांच्याच सोईच्या असतात. साधू-बैरागी व दरिद्री खेरीज करून सर्वांकडून (सोईच्या वर्गवारीप्रमाणें) त्या भाडेंहि घेतात. या सरायांतून भाजी, धान्य, दहीं, दूध, लांकूडफांटा, तेल, तूप, आटा, मेवामिठाई, फळफळावळ वगैरेचीं दुकानेंहि ठेवलेलीं असतात. त्याचप्रमाणें, प्रवाशांना येथें गादी, कॉट, तक्या, लोड, सतरंजी, चौपाई, गालिचा, स्वयंपाकाचीं भांडीं वगैरे भाड्यानें मिळतात. क्वचित् स्नानावळीहि येथें असतात. या ठिकाणीं प्रवाशांच्या नांवागांवाची, उद्योगधंद्याची व प्रवासाच्या कारणाची नोंद केली जाते. त्यावरून असेंहि म्हणतां येईल कीं, महाराष्ट्रांतील 'लॉजिंग बोर्डिंग हाउस' प्रमाणेंच या सराया होत. मात्र या बांधणाऱ्या धनिकांचा उद्देश हॉटेल मालकांप्रमाणें धंदा करावयाचा नसतो; तर केवळ, परोपकारासाठीं व नांव लौकिकासाठींच, त्यांनीं ह्या बांधलेल्या असतात. हिंदुस्थान हा देश प्राचीन काळापासून 'दानशूर' म्हणून नांवाजलेला असल्यामुळें त्यांतील दात्यांनीं व राजेरजवाड्यांनीं प्रवाशांची सोय कोठें अल्पखर्चांत तर कोठें अगदींच फुकट करून ठेविली आहे. पण युरोप, अमेरिका वगैरे पाश्चात्य देशांतील लोक पूर्ण व्यापारी तत्त्वाचे व भावनेपेक्षा बुद्धीच्याच विशेष आहारीं जाणारे असल्यामुळें, त्यांच्या देशांत, प्रवाशांच्या जेवण्याची व उतरण्याची सोय करणाऱ्या संस्था, धर्मादायाच्या तत्त्वावर न निघतां, उद्योगधंद्याच्याच तत्त्वावर निघाल्या व धंद्यांतील स्पर्धेमुळेंच त्यांच्यांत लवकर सुधारणा झाल्या. म्हणूनच आज युरोपांतील हॉटेलें या चैनीच्या संस्था समजल्या जातात, तर उलट, हिंदुस्थानांतले 'पथिकाश्रम' हे प्रवाशांची केवळ अडचण भागविणाऱ्या व नाइलाज म्हणून उपयोग करून घेतल्या जाणाऱ्या सोईच्या संस्था वाटतात.

आगगाड्या, आगबोटी, मोटारी (व हल्लीं विमानें) यांनीं प्रवास सोईचा व बिनत्रासाचा केल्यामुळें हिंदुस्थानांत आतां प्रवाशांची संख्या सारखी वाढतच आहे. पूर्वीं, पायीं काशीयात्रेला वर्ष-दीड वर्ष लागे म्हणतात. पानपतच्या युद्धांतल्या पराभूत सैनिकांना स्वदेशीं म्हणजे महाराष्ट्रांत येण्याला कोणाला सहा महिने, कोणाला आठ महिने तर कोणाला वर्षहि लागल्याचें इतिहास सांगतो. छत्रपति शिवाजी महाराजांनाहि आग्र्याहून रायगडीं पोंचायला दहा महिने लागले. अर्थात् त्यांचा कांहीं प्रवास घोड्यावरूनहि झाला असेल. छत्रपति राजाराम महाराजांचा 'जिंजिवास' असाच दीर्घ कालावधीचा,व हालअपेष्टांचा आहे.पुढें पेशवाईंतसुद्धा प्रवास सुखाचा झालेला दिसत नाहीं. पेशवाई व आंग्लाई यांच्या मध्यकाळांत प्रवाशांना लुटणारी 'गामछोडा' नांवाची एक जात होती ती यात्रेकरू व व्यापारी या वाटसरूंवरच उपजीविका करीत असे यावरून पूर्वींचा प्रवास किती धोक्याचा व किती कष्टाचा होता याची कल्पना येते. कै. चिंतामणराव वैद्यांनीं वरसईकर भटजींच्या 'माझा उत्तर हिंदुस्थानचा प्रवास' या बखरीवरूनच सत्तावन सालच्या बंडाचा इतिहास लिहिला आहे. त्यावरून पेशवाईनंतरच्या हिंदुस्थानच्या प्रवासाची बरीच कल्पना करतां येते. 'दुर्दैवी रंगू' 'लालन बैरागन' व 'विंध्याचल' या कादंबऱ्यांवरूनही ऐतिहासिक काळांतल्या प्रवासाची कल्पना करतां येईल.

अतिथींचा आदरसत्कार करून त्यांचे प्रवासांतले हाल हलके करणें हें पूर्वीं गृहस्थाश्रम्यांचें कर्तव्यकर्मच समजलें जात होतें. धर्मशाळा, अन्नछत्रें व पाणपोया हीं त्याचींच भव्य स्वरूपें होत.

प्रवाशाला 'पथिक' व 'अतिथी' हे समान अर्थाचे शब्द जरी लागत असले, तरी त्यांत मोठाच फरक आहे. प्रवासी श्रीमंत व गरीबहि असूं शकतात, पण त्या सर्वांनाच 'अतिथि' किंवा 'पांथस्थ' म्हणतां येणार नाहीं. दानधर्माच्या अन्नपाण्यावर प्रवास करणारा तो 'अतिथि' किंवा 'पांथस्थ' असें म्हणतां येईल. उलट, स्वखर्चानें प्रवास करणारा प्रवासी त्याला 'पथिक' म्हणतां येईल. याला अपवाद, पूर्वी मध्यम स्थितींतले यात्रेकरू अर्धवट लोकाश्रयावरच आपल्या यात्रा करीत असत, हा आहे. ते देवधर्माला लागणारा पैसा व प्रत्यक्ष लागणारी शिधासामुग्री स्वतःची खर्च करून ( गांवांत कुठेंच ओळख नसल्यास ) फक्त उतरण्यासाठीच धर्मशाळांचा आश्रय घेत.

हिंदुस्थानांत यात्रेकरूंच्या उतरण्याची व भोजनाची मोबदला घेऊन सोय करणारे 'पथिकाश्रम' उघडण्याचा जर कोणी पहिला उपक्रम सुरू केला असेल, तर तो क्षेत्रांतल्या चोबे, पंड्ये व गयावळ यांनीच. त्यावरून आजच्या खानावळवाल्यांचे व पथिकाश्रमवाल्यांचे तेच खरे पूर्वज ठरतात! त्यांनासुद्धा ही कल्पना सुचण्याचें कारण, यात्रेकरू यजमानांची रोज उतरण्याची व भोजनाची सोय लावून देण्याची पडणारी अडचण व लागणारी जरूरी.

पौराणिक व ऐतिहासिक काळांत प्रवाशांकडून घरभाडें घेण्याची पद्धत नसावी, एवढेंच केवळ नव्हे तर,प्रवाशाला स्वगृहीं आणून अत्यादरपूर्वक, जेवणाखाण्यासहि फुकट द्यावें, अशीच आपल्या हिंदू धर्माची परंपरा होती. अर्थात 'पथिकाश्रम' हा 'धंदा' कधी ठरला व त्याला धंद्याचें स्वरूप कोणी दिलें, हा प्रश्न चिकित्सक मनापुढें सहाजिकच उभा रहातो. त्या प्रश्नाचें उत्तर हेंच, कीं आजच्या खानावळवाल्यांचे व पथिकाश्रमवाल्यांचे पूर्वज पंढरपूरचे पंड्ये, नाशिकचे चोबे, काशीचे गंगापुत्र व गयेचे गयावळ असले पाहिजेत.

'गरज हीच सर्व कलांची व धंद्यांची जननी होय.' परिस्थितीप्रमाणें देशांतील कांहीं लोकांना उपजीविकेसाठी जशा खानावळी किंवा पथिकाश्रम काढणें प्राप्त झालें असेल तशाच कांहीं परिस्थितीप्रमाणें प्रवाशांना 'पथिकाश्रमांचा' उपयोग करून घेणें जरूर वाटलें असेल आणि कांहीं गृहस्थांना घरांतल्या अडचणींमुळें किंवा घर करतां न आल्यामुळें खानावळींत भोजन करणें भाग पडलें असेल. अर्थात ही उभयतांची गरजच या धंद्याच्या उत्पत्तिस कारणीभूत होय, असेंच म्हटलें पाहिजे. पूर्वी उपजीविकेचें साधन म्हणूनच ( आपद्धर्म समजून ) हा व्यवसाय स्वीकारला गेला; पण 'भोजनालयें' आणि 'पथिकाश्रम' यांच्याकडे 'धंदा' या दृष्टीनें पहाण्याचा आजचा काळ आहे.

प्रवासाच्या सुलभ साधनांमुळें प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस झपाट्यानें वाढत आहे. त्याचप्रमाणें देशाच्या दारिद्र्यामुळें कुटुंबसंस्था नष्ट होत आहेत व अतिथिसत्कार नाहींसा होत आहे; अशा स्थितींत पथिकाश्रम व खानावळी यांना धंद्याचें स्वरूप येणारच. अर्थात देशकालपरत्वें त्यांत सुधारणा होणें जरूरच आहे. त्या सुधारणा कशा कराव्यात व धंदा या दृष्टीनें देशाच्या या उपयुक्त संस्थांकडे जनतेनें कसें पहावें तें मी पुढील लेखांत सुचविणार आहें.


# पुणें जिल्हा सहकारी लँड मॉर्गेज बँक लि.

लक्ष्मी रोड—पुणें शहर

जुनीं कर्जे फेड, यंत्रें व जमिनी खरेदी करणें, ताली-विहिरी, यांकरितां पुणें जिल्ह्यांतील शेत जमिनीचे तारणावर द. सा. द. शे. ६ टक्के व्याजाचे दरानें १५ ते २० वर्षे मुदतीवर कर्ज दिलें जातें. आजपर्यंत बँकेनें दोन लाख रु. कर्ज दिलें आहे. गरजूंनीं अधिक माहितीसाठीं बँकेचे कचेरींत चौकशी करावी.

२२-१०-३८ रा. ब. वसगडेकर, मॅनेजर

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar. - -

POONA CITY.




आपल्या स्वयंपाकघरांत

आमचे येथील, ताजा, स्वादिष्ट, खमंग, रुचकर, घरगुती
मसाला, पापड, मेतकूट, भाजणी, लोणचें,
मुरावळा व इतर निवडक किराणा जिन्नस
वापरून निवडण्याचा त्रास वांचवून वेळाची बचत करा.

के. कमलाकर आणि कंपनी (पुणें) ची

निर्भेळ, बिन किडकी, आरोग्यदायक, रुचकर व भरपूर
मसाल्याची ऑफीस सुपारी वापरा

आजच आमच्याकडे मागणी करा:—
म. गो. कुलकर्णी आणि मंडळी
फडतरे चौक, ५८६ सदाशिव, पुणें शहर

# आनंदाची घोषणा आणि प्रेमाचें आव्हान

◆ गव्हाचे पोहे ह्या नांवानें महाराष्ट्रास सुपरिचित असलेल्या " व्हीट फ्लेक्स्– " ( ब्लॉसम ) ची मागणी गेल्या दोन वर्षांत चढत्या पायरीनें वाढत असल्याचें अनुभवास आलें. इतकें कीं कारखाना अहोरात्र चालवूनहि मागणीइतका पुरवठा करणें आवांक्याबाहेरचें काम होऊन बसलें. नवोदित धंद्याचा हा एका दृष्टीनें विजय असला तरी मागणीबरहुकूम पुरवठा करण्यास पंचाईत पडावी हा आमच्या दृष्टीनें मोठा नामुष्कीचा प्रसंग होता. बेसुमार मागणी येणें ही जेवढ्या आनंदाची, तितकीच ती पुरविता न येणें ही मनाला लागून राहणारी गोष्ट होती.

◆ ह्याला उपाय ! पुरवठा करता येईल इतपतच मागणी स्वीकारावयाची हा जुना सावधपणा अंगिकारावयाचा कीं मागणी वाढेल तसतसें पुरवठ्याचें मापहि अस्तन्या सरसावून पुरें करीत रहावयाचें !

◆ आम्हीं सावधानपूर्वक साहस करावयाचें ठरविलें. बाजारांत मागणीचें तोंड उकलण्यास कारखानदारास कोण आटापीट करावी लागते, चांगुलपणाचें अधिष्ठान पक्कें होण्यास केवढ्या सावचित्तानें जाळें पसरावें लागते आणि अशारीतीनें एकवार मागणी निर्माण होतांच ती पुरविण्यासाठीं जीव कसा पणास लावावा लागतो ( कारण मालाच्या निर्मितीबरोबरच त्याची गुणाढ्यताहि कशी तोळ्यामाशानें राखावी लागते ), हें कारखानदाराच्या वंशास गेल्यावांचून उमगणें कठीण आहे.

◆ आणि ही उमग आमच्या गुणज्ञ ग्राहकांनीं आम्हांस आणून दिली हे त्यांचे उपकार समजून आम्हीं साहस करावयाचें ठरावेलें. आमच्या कारखान्याचें वाढतें स्वरूप हें त्या साहसाचें दृश्य फल होय.

◆ पूर्वींचा आमचा एक यंत्रात्मक कारखाना आतां पूर्वींपेक्षां दसपट माल निर्माण करील इतका कार्यक्षम बनला आहे. यंत्रांची संख्या वाढविली आहे. कामकरी द्विगुणित झाले आहेत. पुणें म्युनिसिपालिटीनें खास कारखान्यासाठीं आंखून दिलेल्या क्षेत्रांत जागा घेण्यांत आली आहे. पडळीवजा उभारलेल्या पाख्याऐवजीं आतां स्वच्छ, हवाशीर व भरपूर उजेडाची जागा लाभली आहे. सारांश, आतां नव्या परिसरांत निर्माण होणाऱ्या **व्हीट फ्लेक्सना** गुणाधिक्य लाभलें असल्यास नवल नाहीं.

◆ देशीयता ही गुणास्पद् तशीच दोषास्पद् मानणारे देशिक आहेत. ही देशीयता गुणास्पद् मानणारांचें कौतुक करावें नि आभार मानावे तितके थोडेच होणार आहेत. कारण त्यांच्या अभिमानामुळेंच देशी धंद्यांची प्रगति झालेली आहे व होत आहे. पण देशीयता दोषास्पद् मानणारांस आम्हांस नम्रपणें आव्हान द्यावेसें वाटतें कीं, त्यांनीं आमचे **व्हीट फ्लेक्स्** नाममुद्रा न पाहता परदेशी मालाबरोबर ताडून पाहावे आणि ते कोणत्या गुणांत न्यूनांग आहेत हें आम्हांस समभाग दाखवून द्यावें. उलटपक्षीं, परदेशी **व्हीट फ्लेक्सची** चव जिभेवर पक्की बसलेल्या गृहस्थांनीं आमच्या **व्हीट फ्लेक्स्** बद्दल काय म्हटलें आहे, तसेंच विदेशीचा त्याग करून ते आमच्या **व्हीट फ्लेक्स्चे** कसे भोक्ते बनले आहेत, हें आम्ही सहर्षानें प्रत्ययास आणून द्यावयास तयार आहों.

◆ आमच्या अभिमानी ग्राहकांनों, हें आव्हान आम्हांस प्रौढीदाखल मिरवावयाचें नाहीं. हे **व्हीट फ्लेक्स्** परदेशींच्या तोडीचे किंबहुना रेसभर सरसच बनविनां आले, ही बाब आमच्याप्रमाणें आपणांसहि अभिमानास्पद् वाटेल. कारण आपण आश्रयदाते आहां. आपल्यां आश्रयाखालीं आम्ही ह्यापेक्षांहि अधिक कर्तृत्वशाली व्हावें आणि हिंदुस्थानांतील एका धनोत्पादक धंद्यास उर्जितावस्थेत आणावें हीच आमची आकांक्षा आहे.

◆ आमच्या **व्हीट फ्लेक्सनीं** आपला दिवाळीचा आनंद द्विगुणित होवो.

## दि ब्लॉसम मॅन्युफॅक्चरिंग कं. लिमिटेड

## नवापूल, पुणें. गिरगांव, मुंबई.

## दी प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें.

श्री. रामचंद्र नरहर अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी., मॅनेजिंग एजंट, कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कं. लिमिटेड, पुणें यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यांत स्थापन झालेल्या या बँकेचें अधिकृत भांडवल दहा लक्ष रुपये असून तें दहा हजार भागांत विभागलेलें आहे. प्रत्येक भागाची किंमत शंभर रुपये आहे. बँकेनें विक्रीकरितां पांच हजार भाग काढलेले आहेत. १९३८ सप्टेंबर अखेर एक लक्ष बेचाळीस हजार पांचशे रुपये दर्शनी किंमतीचे एक हजार चारशें पंचवीस रुपयेप्रमाणें वरील भागांचें बँकेकडे पसतीस हजार चारशे रुपये जमा झाले आहेत.

१९३८ सप्टेंबर अखेर बँकेकडे चालू, सेव्हिंग्ज व कायम ठेवींच्या रुपानें सुमारें दोन लाख रुपये जमा होते.

बँकेकडे चालू व सेव्हिंग्ज खातीं सहाशे वीसहून अधिक आहेत.

बँकेच्या स्थापनेचा हेतु कारखान्यास लागणारें भांडवल लांब मुदतीनें पुरवावयाचें हा आहे. देशांतील उद्योगधंदे वाढल्याविना देशाची आर्थिक परिस्थिति सुधारत नाहीं. परंतु पुष्कळसे धंदे भांडवलाचे अभावीं उर्जितावस्थेस येत नाहींत. हिंदुस्थानचें पाऊल उद्योगधंद्याचें बाबतींत हळुहळु पुढें पडत असतां उद्योगधंद्याच्या गरजांकडे लक्ष पुरवून त्या भागविणाऱ्या बँकांच्या अस्तित्वाची आवश्यकता आहे. बँकेनें उद्योगधंद्यास मदत करण्याच्या उद्देशानें कारखानदार व व्यापारी वर्गास एक लक्ष ऐंशी हजारापर्यंत कर्ज दिलें आहे.

बँकेच्या नफातोटा पत्रकाकडे लक्ष देतां १९३७ साल अखेर बँकेला दीडशे रुपयांची तूट झाल्याचें दिसून येते. बँकेनें कामास सुरवात केल्याला ता. ३१ डिसेंबर, १९३७ अखेर सुमारें नऊदहाच महिने होतात व हा अवधी लक्षांत घेतां बँकेला झालेली तूट क्षुल्लक होय असेंच कोणीही म्हणेल. वरील मुदतीनंतर सप्टेंबर, १९३८ अखेर पर्यंतच्या बँकेच्या व्यवहाराचा आढावा काढतां बँकेला झालेली तूट भरून आली असून बँकेला अंदाजे दोन हजार रुपये नफा उरत आहे.

बँकेच्या संचालक मंडळांत श्री. रामचंद्र नरहर अभ्यंकर (अध्यक्ष), श्री. ग. रा. साठे बिस्किट कारखानदार ( उपाध्यक्ष ), श्री. श्री. म. जोशी, माशिनरीचे व्यापारी, श्री. दा. ग., बापट, डायरेक्टर पूना मर्चंटस को. बँक; श्री. चिं. त्रिं. चितळे (मॅनेजिंग डायरेक्टर) श्री. स. के. भावे, श्री. सावरकर, श्री. वा. पा. वैद्य, मेकॅनिकल व इलेक्ट्रीकल एंजिनिअर अशी मंडळी आहेत. श्री. वैद्य यांना खातेदारांतर्फे डायरेक्टर म्हणून संचालक मंडळांत घेण्यांत आलेले आहे. श्री. चिं. त्रिं. चितळे हे बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टरचे काम करीत असून आज पावेतो त्यांनीं तें काम विनामूल्य केलें हें त्यांस भूषणावह आह.

### डेक्कन पेपर मिल्स कं. लि.

महाराष्ट्रांतील कागदाच्या यांत्रिक उत्पादनास प्रारंभ करून त्या धंद्याचें संवर्धन करण्याचें कार्य पुणें येथील पदमजी घराण्यानें निष्ठेनें केलें आहे. सरदार खानबहादुर पदमजी पेस्तनजी ह्यांनीं सुमारें ८० वर्षामागें ह्या घराण्याच्या लौकिकाचा पाया घातला आणि सार्वजनिक कार्याचें व्रत त्यांच्या वंशजांनीं अव्याहत चालवलें आहे. त्यांचे दोघे पुत्र, म. सरदार दोराबजी पदमजी आणि म. सरदार नौरोजी पदमजी ह्यांच्या नेतृत्वाखाली मुंढवा येथें सन १८८५ मध्यें कागदाची गिरणी सुरू झाली; म्हणजे तिच्या स्थापनेस आतां ५० वर्षे होऊन गेलीं आहेत. डेक्कन पेपर मिल्स कं. लि. ही ५ लक्ष रुपये भांडवलाची संयुक्त भांडवलाची कंपनी म्हणून नोंदण्यांत आली. तिचें भांडवल पुढें १९२५ सालीं वाढवून ९½ लक्ष रुपये करण्यांत आलें. मुंढवा येथील गिरणीस मुंबईचे माजी गव्हर्नर, लॉर्ड रे, ह्यांचें नांव देण्यांत आलेलें आहे. डेक्कन पेपर मिल्स कं. लि.चा मुंबई येथेंहि एक कारखाना आहे, त्यांचें नांव पदमजी पेपर मिल असें आहे. तो १९११ सालीं स्थापन झाला आणि नंतर तो कंपनीनें आपल्या ताब्यांत घेतला. कंपनीचे सध्याचे मॅनेजिंग डायरेक्टर, मि. एफ. डी. पदमजी, ह्यांच्या नेतृत्वाखाली वरील दोन्ही कारखाने जोमानें चालूं आहेत. मुंबई प्रांताचे गव्हर्नर, लॉर्ड लम्ले, ह्यांनीं मुंढवा येथील कारखान्यास नुकतीच भेट दिली, त्यावेळीं त्यांनीं पदमजी घराण्याच्या लौकिकाची आणि कामगिरीची स्तुती केली. मुंढवा येथील गुन्हेगार वसाहतींतील लोकांसाठीं मि. पदमजी ह्यांनीं घेतलेल्या मेहनतीचा उल्लेख सरकारच्या एका पत्रकांत नुकताच करण्यांत आला आहे. कंपनीच्या दोन गिरण्यांत मिळून सुमारें ७०० कामगार कामावर आहेत. त्यांच्या हिताची विशेष रीतीनें काळजी घेण्यांत येते.

---

### कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कं. लि.

वरील कंपनीची स्थापना १९२८ सालीं पुणें येथें झाली, तेव्हांपासून तिची अखंड आणि महाराष्ट्रास अभिमानास्पद अशी प्रगति होत आहे. कंपनीचें तिसरें मूल्यमापन चालू असून, त्यांत बराच मोठा वाढावा आढळून येईल, अशी अपेक्षा आहे. सदाशिव पेठेमध्यें लक्ष्मीरोडवर कंपनीच्या स्वतःच्या प्रचंड इमारतीचें बांधकाम चालू आहे. मुंबई, मद्रास, कलकत्ता, दिल्ली, अहमदाबाद, नाशिक, अहमदनगर, सोलापूर, कराची, इत्यादि ठिकाणीं तिच्या शाखा आणि उपशाखा आहेत. श्री. आर. एन. अभ्यंकर बी. ए., एलएल. बी. हे कंपनीचे मॅनेजिंग एजंट आहेत. त्यांची धडाडी आणि कार्यक्षमता ह्यांचे योगानें कंपनीचें कार्य सारखें वाढत आहे.

एच. एच. दि छत्रपती महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील

# जाधव टेलरिंग कॉलेज

**शिवण** कामाबरोबर स्त्री शिक्षकाकडून एम्ब्रॉयडरीचें शिक्षण देण्याचीनवीन सोय केली आहे. माहिती मागवा अगर समक्ष भेटा.

४९७ बुधवार चौक, पुणें २.

### श्रीराम सिल्क थ्रोइंग फॅक्टरी, बंगलोर

वरील कारखान्यांत सध्या ५ हजार चात्या व २५ माग चालत असून वार्षिक उत्पादन ५ लक्ष रुपयांहून अधिक आहे. कारखान्यांत वेगवेगळ्या प्रकारचे रेशमी धागे तयार होतात आणि रेशमी लुगडीं, खण, कद, इत्यादि मालाचेंहि उत्पादन होतें. कारखान्यांत सुमारें ५०० कामगार आहेत. श्री.नारायणराव नाईक हे कारखान्याचे संस्थापक व चालक आहेत. कै.शालगर ह्यांनीं कारखान्यांत भागीदार होऊन बरेच भांडवल पुरविलें; त्यांचे चिरंजीव व बंधु आतां फॅक्टरींत भागीदार आहेत. जपानमधील रेशमाच्या धंद्याचें प्रत्यक्ष अवलोकन करून श्री. नाईक ह्यांनीं आपल्या कारखान्यांत सुधारणा घडवून आणल्या आहेत. रेशमी किड्यांच्या कोशिक्यापासून रेशीम चातीवर चढविण्याकरितां श्री.नाईक ह्यांनीं आतां "दि म्हैसूर सिल्क फिलेचर्स" ही मोठी कंपनी स्थापन केली आहे. कंपनीस म्हैसूर सरकारनें अनेक सवलती दिल्या असून तिचें भांडवलहि चांगलें खपलें आहे. श्री. नाईक ह्यांची कर्तबगारी वाखाणण्यासारखी असून महाराष्ट्रीय जनतेचा त्यांस मिळत असलेला पाठिंबा तिचें अभिनंदनीय निदर्शक आहे.

---

### आयुर्वेद रसशाळा पुणें, लि.

पुणें येथील टिळक महाविद्यालयामध्यें आयुर्वेदीय शाखा सुरू करण्यांत येऊन विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष शिक्षणाकरितां रसशाळा स्थापन करण्यांत आली. ह्याच रसशाळेचें १९३५ सालीं वरील नांवानें लिमिटेड कंपनींत रूपांतर झालें. कंपनीचें अधिकृत भांडवल दोन लक्ष रुपये असून बहुतेक सर्व भाग खपले आहेत. रसशाळेच्या औषधांस सर्वत्र मोठी मागणी असून कंपनीचा व्याप वाढत आहे; ह्यासाठी तिनें आपली स्वतःची इमारत बांधण्याचें काम हातीं घेतलें आहे. औषधें शास्त्रशुद्ध आणि स्वस्त देण्याचें रसशाळेचें धोरण आहे. तिच्या विस्तारास विपुल वाव आहे आणि तिचे चालक कार्यक्षम व व्यवहारचतुर आहेत ही गोष्ट समाधानकारक आहे.

---

### ब्लॉसम मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

ब्लॉसम उर्फ गव्हाचे पोहे तयार करण्याची कल्पना श्री. भा. पां. सहस्रबुद्धे ह्यांस कशी सुचली आणि तिला व्यावहारिक स्वरूप त्यांनीं कसें दिलें, ह्याची उद्बोधक माहिती "अर्था"मध्यें मागेंच येऊन गेलेली आहे. गव्हाच्या पोह्यांचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या यंत्रसामुग्रीची योजना हेंहि त्यांच्या कल्पकतेचेंच फळ आहे. धंद्याची उभारणी आणि त्याचा विस्तार थोड्या अवधींत त्यांनीं यशस्वी रीतीनें केला आहे. एका नवीन पदार्थाच्या उत्पादनाकरितां कारखाना आणि कंपनी उभारून श्री. सहस्रबुद्धे ह्यांनीं उद्योगधंद्यांस योग्य वळण लावलें आहे.

---

### ट्रस्ट ऑफ इंडिया ॲशुअरन्स कं. लि.,

वरील कंपनी १९३५ सालीं कै. दिवाणबहादूर गोडबोले ह्यांचे अध्यक्षतेखालीं स्थापन झाली. तिनें सर्व प्रकारच्या विमा योजनांचा आपल्या पॉलिसींत अंतर्भाव केलेला आहे. सामुदायिक विम्याचा उपक्रमहि तिनें केलेला आहे. कंपनीचीं घड्याळें तर सर्वांस परिचित आहेत.

---

### बँक ऑफ महाराष्ट्र लि.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. ह्या बँकेचें १९३६ च्या फेब्रुवारी महिन्यांत कै. सर सोराबजी पोचखानावाला यांच्या हस्तें उद्घाटन झालें. लक्ष्मीरोडवरील किताब बिल्डिंगच्या एका लहानशा दुकानवजा जागेंत बँकेच्या कामास प्रारंभ झाला व धिमेपणानें व जसा व्यवहार वाढेल तशी जागा व नोकरवर्ग वाढवीत आजचें विस्तृत स्वरूप तिनें स्वतःस प्राप्त करून घेतलें आहे. कोणत्याहि प्रकारची विशेष खटपट अगर गाजावाजा करून भागांचें भांडवल जमा करण्याची आवश्यकता बँकेच्या चालकांस भासली नाहीं. तरीहि बँकेचे भरलेलें भांडवल रु. १,२२,३०० झालें असून तिच्याकडे ठेवी रुपये १४,५०,००० चे वर आलेल्या आहेत. पहिल्या वर्षी बँकेनें आपला सर्व खर्च नफ्यांतून भागवून दुसऱ्या वर्षापासून योग्य त्या रकमा रिझर्व फंडाकडे टाकून डिव्हिडंडहि वाटण्यास सुरवात केली आहे. प्राथमिक खर्चापैकी जवळ जवळ निम्मी रक्कम पहिल्या दोन वर्षांतच फेडून टाकून राहिलेली सर्व रक्कम या वर्षाच्या नफ्यांतून भागवून टाकतां येईल असा अंदाज आहे. बँकेच्या होत असलेल्या सर्वांगिण प्रगतीला जनतेची सहानुभूति व विश्वास हींच मुख्यतः कारणीभूत झालीं असून तीं संपादन करण्यांत बॅंकेस तिच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष व जनतेच्या पूर्ण माहितीचे, विश्वासाचे आणि आपआपल्या व्यवसायांत यशस्वी झालेले संचालक मंडळांतील इतर सभासद यांचें सहाय फार झालें आहे. श्री. मा. वि. गोखले हे बँकेचे कार्यक्षम मॅनेजर आहेत. आतांपर्यंत ज्या तऱ्हेनें बँकेची प्रगति होत आहे तीकडे पाहिल्यास उत्तरोत्तर तिची भरभराटच होईल असा विश्वास वाटतो.

---

### सारस्वत को. बँक लि.

वरील बँकेचे पटावर १,३२६ सभासद असून ६४,८१६ रुपयांचें भांडवल वसूल झालेलें आहे. रिझर्व्ह आणि इतर फंडांत ४५½ हजार रुपये आहेत बँकेकडे ९½ लक्षांच्या ठेवी आहेत. सभासदांकडे २ लक्ष, ६७ हजार रुपये येणें आहेत. थकबाकीचें प्रमाण ७% पडतें. ७ लक्ष, ९ हजार रुपये सरकारी आणि इतर रोख्यांत गुंतविलेले आहेत. गेल्या वर्ष अखेर बँकेस १०⅓ हजार रुपये नफा झाला, त्यांतून ६¼% दरानें डिव्हिडंड वाटण्यांत आलें. श्री. व्ही. पी. वर्दे ह्यांच्या अध्यक्षत्वाखाली बँकेची प्रगति चांगली होत आहे. खऱ्याखुऱ्या सहकारित्वानें बँक चालवण्याचें तिच्या चालकांचें धोरण आहे आणि तिची सांपत्तिक स्थिति समाधानकारक आह.

---

### पुणें जिल्हा को. लॅंड मॉर्गेज बँक लि.

वरील बँकेनें एकूण सुमारें २ लक्ष रुपये इतकें कर्ज शेतकऱ्यांस दिलें आहे. श्री. बा. सि. कामत ह्यांच्या नेतृत्वाखाली बँकेची प्रगति चांगल्या तऱ्हेनें होत आहे. श्री. वसगडेकर हे बँकेचे मॅनेजर म्हणून काम करीत आहेत. चालू सालीं सर्व खर्च भागून बँकेस नफा होईल आणि भागीदारांस डिव्हिडंड देतां येईल असा विश्वास वाटतो.

---

### इंडियन प्रोग्रेसिव्ह इन्शुअरन्स कं. लि.

वरील विमा कंपनीनें अल्पावधींत चांगलें यश मिळविलें असून नवीन विमा कायद्यांतील अटी पार पाडून जोमानें पुढें पाऊल टाकण्यास ती सज्ज झाली आहे. कंपनीचे तरुण व उत्साही सेक्रेटरी, श्री. कलंत्रे आणि श्री. गाडगीळ, ह्यांच्या तडफदार कामगिरीमुळें कंपनीचा कारभार समाधानकारक रितीनें वाढत चालला आहे.

## थंडीचा कहर म्हणजेच शिंप्यांची दिवाळी

( ले:–वा. रा. पराडकर, लंडन डिप्लोमॅटिस्ट् व प्रो. टेलर्स कटिंग ॲकॅडेमी, पुणें )

दिपवाळीसारखे सणवार आले म्हणजे इतर धंद्यांप्रमाणेंच "टेलर्स"ना रात्रंदिवस तात्पुरतें काम असतें, व काम करून सणवार आनंदांत घालवितां येतात. परंतु तेवढ्यानें त्यांचें समाधान न होतां खरा आनंद जर केव्हां होत असेल तर जेथें तीन चार महिने एकसारखें गरम काम किंवा लग्नसराईसारखें रेशमी भारी काम मिळून वर्षाच्या मंदीच्या काळाची एकदम भरपाई करण्याची संधि मिळते, तेव्हांच होय.

ही संधि दसऱ्यापासूनच सुरू होते. थंडीचा कडाका सुरू होतो, त्याचा फायदा घेणारे पूर्वींचे टेलर्स असत व वाटेल तेवढ्या ऑर्डरी आल्या तरी त्या घेण्यास ते मागें-पुढें पाहात नसत; कारण, ठरलेल्या मुदतींत कपडा देण्याचें त्यांच्या लक्षांतच येत नसे. हल्लींच्या सुशिक्षित वर्गांत धक्कशीर काम करण्याची संवय झाल्यानें वेळीं-अवेळीं जास्त येणारें काम स्वीकारणें शिंपी लोकांस परवडत नाहीं आणि मुदतींत न होणारें काम परत करण्याची त्यांची तयारी असते; पण मागाहून त्यांस ह्याचा पस्तावा होऊन वर्ष अखेर हिशेब पाहिल्यास धंद्यावर झालेला परिणाम त्यांच्या नजरेस येतो.

पूर्वींचे काम करणारे लोक अशिक्षित व संख्येनें थोडे असत. त्यामुळें त्यांना मोसममध्यें रोज रात्रंदिवस कामें करावीं लागून त्यांच्या शरीरावर व मनावर घातुक परिणाम होई आणि पुष्कळसे लोक व्यसनाधीन व खर्चिक बनत त्यांस पैसा पुष्कळ मिळूनही तो शिल्लक ठेवतां येत नसे. हल्लींच्या लोकांना सरकारी नोकरीप्रमाणें नियमित मिळकतीवर अवलंबून राहून अल्पसंतोषी होणें बरें वाटतें तेंहि तितकें बरोबर नाहीं. तर प्रकृतीस मानवेल तेवढे कर्मअधिक श्रम करण्याची त्यांची तयारी असावी.

सात-आठ वर्षांपूर्वीचा काळ असा होता कीं, एक नेहरु सद्रा व जाकीट घातलें कीं झालें थंडीच्या सीझनचें काम! तेथें भारी गरम कामगारांची जरुरीच नसे. त्यामुळें गरमसारख्या भारी काम करणाऱ्या शिंप्यांचे रोजीं ५ रुपयांचें काम होण्याऐवजीं एक दोन रुपयांच्या सद्र्यांसारखे किरकोळ कपडे बडवीत बसण्याशिवाय आपली करामत दाखविण्यास जागाच नव्हती. ह्यामुळें त्यांचें कामावरचें प्रेम नष्ट होऊन धंद्यावर अनिष्ट परिणाम झाला. तीन-चार वर्षांनंतर हळु हळु परिस्थिति बदलून आतां ती पूर्ववत् झालेली आहे असें हल्ली गरम कपडे सर्रास, देशी विदेशी न पाहतां, करणाऱ्या गिऱ्हाइकांवरून स्पष्ट दिसतें. अशा संधीचा फायदा धूर्त शिंपी आपले खिसे गरम करण्याच्या दृष्टीनें गरम काम येईल तेवढें घेऊन करून घेतील हें उघड आहे. गरम कपड्याच्या लवचीक गुणधर्माप्रमाणें शिंप्यानेंहि आपलें कर्तबगारीचें व चलाखीचें प्रमाण वाढवून याच सीझनमध्यें तरतूद करून ठेविली पाहिजे.

सुटासारखे कपडे गरम कापडाचेच वापरण्यापासून मुख्य फायदा म्हणजे आपल्या शरीररचनेप्रमाणें निरनिराळ्या हालचालींबरोबर जेथें जसा ताण पडत जाईल तसा तो कपडा आपोआपच ताणला जातो, अडत नाहीं व सुखावह होतो. शिवाय, वेळीं अवेळीं चांगला एखादा कपडा उपयोगी पडत असेल तर तो हाच होय. कारण २ ते ५ वर्षेंपर्यंत प्रथमपासून शेवटपर्यंत भारी दिसणारा हा कपडा असतो. हलके कपडे प्रथम दर्शनीं स्वस्त वाटतात, परंतु परिणामीं ते स्वस्त तितके महागच पडतात.

गरम कपडे शिवून देण्यांत टेलर्सना भरपूर शिलई मिळाल्यानें आनंद होतो. त्यामुळें गिऱ्हाइकांच्या मर्जीनुरूप काम करून देण्याची अंशतः तरी त्यांची तयारी असते. शिवाय, असलीं इस्त्रीचीं व हातशिलाईचीं कामें एकाच बैठकींत सर्वच सर्व पुरीं होत नसल्यानें हल्लींच्या काळीं जरूर असलेल्या 'ट्राईंग ऑन' पद्धतीचा उपयोग करून घेण्यास सांगण्यास टेलर्सचें मन कचरत नाहीं. आर्डर्स घेते वेळेस राहिलेल्या शंकांचें निरसन होऊन निरनिराळा फेरबदल सुचविला गेला तरी त्याप्रमाणें काम करून देण्यास जादा श्रम न पडतां कामांत काम होऊन जातें व तयार कपडा झाल्यावर गिऱ्हाइकांची तक्रार राहात नाहीं.

गरम कपडे, फिटिंगच्या बाबतींत निरनिराळ्या विषम प्रमाणांच्या लोकांच्या शरीराच्या ठेवणीप्रमाणें फेरबदल करून पुन्हा समप्रमाण आकृति दाखवून देण्यास व फॅशन प्लेटप्रमाणें काम करून देण्यास समजणाऱ्या टेलर्सना मदतच करितात. जरूरी प्रमाणें कपडा जिरविणें, ताणणें, भर घालणें किंवा वळविणें इत्यादि कामें कापसाच्या कपड्यावर त्याच्या ताठपणामुळें शक्य होत नाहींत परंतु गरम कपड्यावर कोणताही फरक केला तरी तो वरून समजून येत नाहीं. सध्या फिटिंगची 'टेस्ट' इतकी कांहीं वाढली आहे कीं साधा ५ आणे वाराच्या कोटाचा जरी कपडा असला व मशीन शिलई असली तरी त्या कोटामध्यें कॅनव्हस घाला, पॅच पॉकेट्स करा, हातशिलईप्रमाणें फ्रंट्स प्लेन दाखवा व ट्रायलला ठेवा, आणि शिलई मात्र १॥ रुपयाच्या कापडाला १॥ आणि २॥ रुपये घेऊं नका, कारण कापडापेक्षा ती जास्त होते अशी गिऱ्हाइकांची मागणी असते.

हल्ली निरनिराळ्या जातींचीं हलकीं कापडें निवडून स्वस्त दरांत शिलाई करून मागण्याची प्रवृत्ति जरी दिसली तरी साधारण टेलर्सचा त्यांत कांहीं तोटा आहेसें दिसत नाहीं; पुन्हां पुन्हां असले कपडे करण्याची पाळी येते. कारण, कापडहि तितकेंच टिकाऊ असतें !

पूर्वी आपल्याकडे बाराबंद्या किंवा पेट्या केल्या म्हणजे थंडीचें संरक्षण घरांत बसून व्यवसाय करणाऱ्या लोकांचें होत असें, तेंहि काम मध्यंतरीं 'स्वेटर्स' निघाल्यापासून मुलांच्या, स्त्रियांच्या व पुरुषांच्या पोषाखांतून कमी झालेलें होतें. परंतु थंडीसाठीं 'फिट्' कपडा असल्याशिवाय समाधान होत नाहीं व स्वेटर्स वापरण्यास सुरू केल्यापासून ते इतके कांहीं एकसारखे ताणले जातात व पोटावर सैल होतात कीं दोनतीन महिन्यांतच ते बदलावे लागतात. त्यामुळें मुलांच्या व पुरुषांच्या बाबतींत पूर्वींचे पेट्यासारखेच, व स्त्रियांचे बाबतींत पोलकें, ब्लाऊझ सारखे, कमरेंत फिट्ट बसणारे कपडे येऊं लागले आहेत. तेव्हां, टेलर्सना आपला थंडीचा सीझन इस्त्रीजवळ बसून काढतां येईलसा रंग दिसतो.

हल्लीं सुशिक्षित लोक ह्या धंद्यांत पडल्यापासून शिंपी म्हणजे कोणीतरी सामान्य मनुष्य नसून कपड्यांचा तो एक डॉक्टरच आहे, असें वाटूं लागलें आहे. डॉक्टर लोकांकडून एकाच रोग्याला अनेकवार प्रिस्क्रिप्शन्स व इंजेक्शन्स दिलीं जाऊन भरपूर चार्ज केला जातो, त्या प्रमाणेंच अनेकवार एकाच सुटांत आल्टरेशन्स करून गिऱ्हाइकांस त्यांच्या म्हणण्याप्रमाणें बरोबर कपडे करून दिल्यावर जेवढे दिवस किंवा वेळ जास्त लागला असेल तेवढ्याचा जास्त चार्ज करण्यास शिंप्यास मनाई होत नाहीं. कारण, सुशिक्षितांस सरळ भाषेंत योग्य तीं कारणें दाखवून, पटवून दिल्यास त्यांची खात्री होते कीं आपल्या पैशाचा अपव्यय होत नाहीं आणि 'दाम करी काम' हें तत्त्व अनुभवास येतें.

---

# —किती आनंददायक!—

[१] 'स्कोडा' कंपनीला मशिनरीची सर्व रक्कम आपल्या सिंडिकेटनें दिली.

[२] सिंडिकेटची मशिनरी किंवा ऊंस कोठेहि गहाण अगर तारण दिलेला नाहीं.

[३] १९३९ सालीं चार लक्ष रुपयांची साखर तयार होणार.

[४] १९४० सालीं बारा लक्ष रुपयांची साखर तयार होणार.

[५] महाराष्ट्राच्या औद्योगिक यशाला मदत

व

**दरसाल साडेपांच टक्के व्याज व दोन वर्षांनीं डिपॉझिटची रक्कम परत.**

सविस्तर माहिती व डिपॉझिट फॉर्म खालील पत्त्यावर मिळतील.

**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड,** २५७ बुधवार पेठ, पुणें २.

# दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी, लिमिटेड.

**रे पेपर मिल, मुंढवा, पुणें. — पदमजी पेपर मिल, मुंबई.**

पूर्वी आम्हांस लागणारा सर्व कागद आम्ही आपल्या देशांतच तयार करीत होतों, आणि महाराष्ट्रांतील कागदाचा धंदा सुप्रसिद्ध होता.

सध्यांच्या यांत्रिक युगांत, कागदाचे प्रकार आणि त्यांस असलेली मागणी विलक्षण वाढली असतां आम्हीं पूर्ण स्वदेशी कागदच कां वापरूं नये आणि आम्हांस सर्व स्वदेशी कागद कां पुरवतां येऊं नये!

ह्या प्रश्नांस, दि डेक्कन पेपर मिल्स कंपनीनें, अनेक प्रकारांचा व प्रतींचा कागद आपल्या कार्यक्षम कारखान्यांत तयार करून समाधानकारक उत्तर दिलें आहे.

तुम्हांस कसलाहि कागद पाहिजे असो, त्यासंबंधानें खालील पत्त्यावर चौकशी करून तो कागद घ्या.

८१५-१६ भवानी पेठ, पुणें. — अहमदाबाद हाऊस, बॅलर्ड एस्टेट, मुंबई.

## सदर्न निटिंग वर्क्स लि.

शेतीला जोड धंदा म्हणून श्री. सुपणेकर व श्री. कुळकर्णी यांनीं सुमारें वीस वर्षांपूर्वी होजिअरीचा धंदा कऱ्हाडजवळ सुपणें नामक खेड्यांत सुरू केला. पहिलीं पंधरा—सोळा वर्षें चालकांचें लक्ष विशेषेंकरून शेतीकडे होतें. होजिअरीचा धंदा चालू होताच व त्यांतहि प्रयोग चालू असून चालकांना त्यांत बरें यश मिळण्याचा आत्मविश्वास वाटूं लागला होता. परंतु त्याबरोबर औद्योगिक कारखाना भरभराटीला येण्यास तो बाजारपेठेच्या नजीक उभारला जाणेंच आवश्यक आहे ही गोष्ट चालकांना कळून चुकली होती. त्यामुळें त्यांनीं शेती सोडून १९३४ सालीं आपला कारखाना पुणें येथें आणला व सर्व लक्ष होजिअरीच्या धंद्यांत केंद्रीभूत केलें. सर्व प्राथमिक अडचणींना यशस्वी रीतीनें तोंड देऊन त्यांनीं कारखाना यशस्वी केला. परंतु स्वतः धंद्यांत घातलेलें भांडवल कारखान्याच्या वाढत्या व्यापाच्या दृष्टीनें अपुरें पडूं लागल्यामुळें १९३६ च्या नोव्हेंबरांत धनिक स्नेह्यांच्या मदतीनें चालकांनीं खाजगी मालकीच्या कारखान्याचें रूपान्तर इंडियन कंपनीज ॲक्टाचे अन्वयें प्रायव्हेट लिमिटेड कंपनींत केलें.कंपनीच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष शेठ काकुभाई व एक मॅनेजिंग एजंट श्री. श्री. वि. सुपणेकर हे जपानला जाऊन तेथील होजिअरीच्या धंद्याचें सूक्ष्मावलोकन करून व धंद्याच्या दृष्टीनें अद्ययावत् ( अपटुडेट ) अशी यंत्रसामुग्री खरेदी करून आले. ही सर्व यंत्रसामुग्री आली म्हणजे कंपनीच्या कारखान्यांत दररोज हरतऱ्हेचा ६०० ते ७०० डझन माल निघूं लागेल व प्रतिदिनीं सुमारें तीनशे ते साडेतीनशे कामगार या कारखान्यांत कामाला लागतील. आज कारखान्यांत सुमारें सवाशें माणसें काम करीत आहेत. कंपनीचें उत्पादन जसजसें वाढूं लागलें तसतसा दर नगामागें उत्पादनाचा खर्चहि कमी होऊं लागला व त्यामुळें कारखाना आज यशस्वी रीतीनें आपल्या स्पर्धकांशीं टक्कर देऊन आपलें अग्रेसरत्व प्रस्थापित करीत आहे.

कारखान्याच्या चालकांची व्यक्तिगत हितापेक्षा कारखान्याच्या हिताकडे अधिक लक्ष देण्याची प्रवृत्ति विशेष उल्लेखनीय आहे. मूळच्या मालकद्वयांनीं आपला खासगी मालकीचा कारखाना लिमिटेड कंपनीच्या स्वाधीन करतांना 'गुड वुईल' म्हणून एक दिडकीहि घेतली नाहीं. शेठ काकूभाई व श्री. सुपणेकर यांनीं जपानचा प्रवास कारखान्याच्या कामाकरतां केला; परंतु प्रवासखर्च स्वतः सोसला; कारखान्यावर त्याचा बोजा टाकला नाहीं. कंपनीच्या संस्थापनेचा खर्च फक्त रु. ६३६८४ आलेला आहे. इतर अनेक कंपन्यांच्या खर्चाशीं तुलना करतां हा खर्च अत्यल्प आहे.

कंपनीच्या संचालक मंडळांत उत्पादक व विक्रेते या दोघांचाहि समावेश आहे. कंपनीच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष शेठ द्वारकादास हरिदास वखारिया ऊर्फ काकुभाई हे होजिअरी मालाचा फार मोठ्या प्रमाणावर व्यापार करणाऱ्या मुंबईच्या सुप्रसिद्ध पोपटलाल घेलाभाई आणि कंपनीचे मालक आहेत. त्यांनीं या कंपनीच्या मालाच्या विक्रीचें तंत्र इतकें उत्तम बसवून दिलें आहे कीं आजपर्यंत कंपनीला मालाच्या उठावाकरितां वृत्तपत्रांतून जाहिरात द्यावी लागली नाहीं म्हटलें तरी चालेल. वस्तुस्थिति अशी कीं, मागणी पुरविण्याकरितां कारखान्याला रात्रपाळी व दिवसपाळी करावी लागते. चालकांनीं कामगार वर्गामध्यें कारखान्याबद्दल आपुलकीची भावना उत्पन्न केलेली आहे.

स्वतःला कार्यनिपुण असा कामगार वर्ग मिळावा म्हणून मर्यादित संख्येपर्यंत शिकाऊ विद्यार्थी ठेवण्याची व्यवस्था चालकांनीं केली आहे. आज पुढारलेल्या वर्गांतील सुमारें पंचवीस स्त्रिया या कारखान्यांत काम करून आपला उदरनिर्वाह स्वाभिमानानें करीत आहेत. कारखान्यांत तयार होणारा माल उच्च प्रतीचा असल्याबद्दल बाजारपेठेंत लौकिक आहे. कारखान्यांत गिऱ्हाइकांची क्रयशक्ति लक्षांत घेऊन हरतऱ्हेचा हलका व उंची माल निघत आहे. नवीन 'लव्हली' नांवाचा उंची माल निघूं लागला आहे.

प्रथम वार्षिक ताळेबंदावरून कंपनीचा कारभार सुव्यवस्थित, पद्धशीर व फायदेशीर असल्याचें आढळून येतें. कंपनीला पहिल्या वर्षअखेरीला यंत्र सामुग्री, इमारती, फर्निचर वगैरे करतां रु. २३०० घसारा म्हणून बाजूला काढल्यावर, मॅनेजिंग एजंटांचें कमिशन दिल्यावर व इमारती, यंत्र सामुग्री वगैरेंच्या विम्याचा प्रिमिअम भरल्यावर सुमारें निवळ रु. ३४००८५ फायदा झाला. त्यापैकीं शेअर होल्डरांना शेकडा ६ टक्के डिव्हिडंड देऊन कंपनीनें रु. १००० चा सर्व साधारण शिल्लक नीधि निर्माण केला व पुढील वर्षाकरतां रु. ४६४ ची रक्कम फायदा म्हणून ओढून घेतली आहे.

## जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग ॲन्ड कटिंग

शिवणकलेच्या शास्त्रोक्त शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उच्च हेतूनें प्रेरित होऊन प्रो. वाय. टी. जाधव यांनीं आपला चांगला किफायतशीर चालत असलेला शिवण कामाचा बऱ्याच वर्षांचा धंदा समाजास उपयोगी व्हावा म्हणून त्याचें शिक्षण देण्याचा क्रम सुरू केला. शिवण कलेचें महत्त्व त्यावेळीं जनतेसमोर मांडण्याचा व ही कला लोकादरास पात्र करण्याचा प्रो. जाधव यांनीं शिकस्तीचा प्रयत्न केला व समाजांत या धंद्याची आस्था व आवड उत्पन्न केली. जनतेंत या धंद्याची वाढती अभिरुची उत्पन्न झालेली पाहून जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग ॲन्ड कटिंग ही संस्था पुणें येथें १९२० सालीं स्थापन केली. या कलेची अधिक वाढ करण्यास सरकारचा पाठिंबा पाहिजे असें वाटल्यावरून सरकारमान्यतेकरितां अत्यंत निकराचा प्रयत्न केला व सरकारचें लक्ष या धंद्याकडे वेधवून सरकारी मान्यतेचा पहिला मान १९३१ सालीं मिळविला.

आजपर्यंत शिवणकला प्रसाराचें काम संस्थेनें अत्यंत सुव्यवस्थित व शास्त्रोक्त पद्धतीनें केलें आहे. त्यांत पुरुषांचे व स्त्रियांचे निरनिराळे शिक्षणात्मक कोर्सेस ठेवून यशस्वी उमेदवारांना सर्टिफिकेटस व डिप्लोमा दिले जातात.

यापुढें स्त्रियांना टेलरिंगचे कोर्सबरोबर कशिदा व शिवणकाम यांचेंहि शिक्षण मिळेल तर बरें अशी जरूर भासूं लागली व म्हणून लेडीज टेलरिंग कोर्सबरोबर या शिक्षणाचाहि कोर्स आखण्यांत आला. याच्या परीक्षा घेऊन याबद्दल सर्टिफिकेट्स व डिप्लोमा देण्याची नवीन योजना केली आहे.

म्हैसूर सरकारनें आपल्या संस्थानांतील धंदे शिक्षणाचे शाळांत शिवणकलेच्या शिक्षणाची सोय केली आहे. अशा शाळेंत टेलरिंग टीचर म्हणून नोकरी करणारास जाधव टेलरिंग कॉलेजचा डिप्लोमा लायकीचा दाखला म्हणून मान्य केला आहे आणि हें म्हैसूर संस्थाननें आपल्या गॅझेटमध्यें प्रसिद्ध केलें आहे.

श्रीमच्छत्रपति महाराज, कोल्हापूर, यांनीं कॉलेजला आश्रय देऊन मान्यता दिली, तें ता. ८ आक्टोबर १९३६ चे गॅझेटमध्यें प्रसिद्ध झालें आहे.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% कन्व्हर्शन लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११६–१२ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०२—० |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—८ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९८–२½ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०५—६ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९९–१२ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( विगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रुव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११३—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२४—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेले भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४४–१२ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११२–१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३०—० |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५७६—४ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११४–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% ... ... | ११९—० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १७५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १६४—६ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५¾% ... ... | १३०७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४१२—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १८८—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४१—८ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १९—९ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३८—६ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४३२५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०६—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १५८—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | २८८—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १३७१–८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ७ रु. ८ आ. ... | १०९–१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०३—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९५—८ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९२६—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७२२—८ |

एव्हरेस्ट स्टुडिओ फोटोग्राफीचीं एनलार्जमेंटचीं व पेंटिंगचीं एव्हरेस्ट स्टुडिओ

सर्व प्रकारचीं कामें वेळेवर व सुबक करून दिलीं जातात. एक वेळ कामें पाहून खात्री करून घ्या.

— अप्पा बळवंत चौक —

प्रभात टॉकीज समोर, पुणें शहर.

आयुर्वेद रसशाळा पुणें लि.

आमचीं औषधें हॉस्पिटलमध्यें पारखलेलीं गुणकारी शास्त्रोक्त असून स्वस्त आहेत

च्यवनप्राश सुखसारक वज्रदंती केशवर्धन सुवर्ण मालिनी वसंत

इत्यादि लेह, चूर्णें, मात्रा, तेलें, भस्में, आसवें, अरिष्टें वगैरे सर्व प्रकारचीं देशी औषधें तयार होतात.

कॅटलॉग मागवा. एजन्सीसाठी पत्रव्यवहार करा.

आयुर्वेद रसशाळा पुणें लि.

## युनायटेड वेस्टर्न बँक, लि.

### नाशिक येथील शाखेचें उद्घाटन

वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कंपनीचे नाशिक येथील ऑर्गनायझर रा. एस. के. देशपांडे, यांचे देखरेखीखाली त्याच ऑफिसांत सदर विमा कंपनीचे आश्रयाखालील युनायटेड वेस्टन बँकेची शाखा नाशिक येथें मि. कार्तिक शुद्ध १ प्रतिपदा शके १८६० सोमवार ता. २४-१०-३८ रोजीं जनतेच्या सोईकरतां तेथील वकील श्री. भाऊसाहेब पाटणकर यांचे अध्यक्षतेखाली तिचा उद्घाटन समारंभ होऊन सुरु झाली. त्या निमित्त या बँकेचे शाखेमार्फत पानसुपारी समारंभ करण्यांत आला. पानसुपारीस गांवांतील सुमारें ३०० ते ३५० प्रमुख मंडळी आली होती.

प्रथमतः या शाखेचे एजंट व विमा कंपनीचे ऑर्गनायझर श्री. एस. के. देशपांडे यांनीं बँकेच्या हेड ऑफिसचे श्री. चिरमुले ( चेअरमन ), श्री. भाऊसाहेब सोमण, श्री. गणपतदास देवी, वगैरे सर्व डायरेक्टर मंडळींची माहीती सांगून या बँकेचे शेअर्स-पैकी बराच भाग सुप्रसिद्ध वेस्टर्न इंडिया विमा कंपनीनें घेतला असल्यामुळें बँकेस विमा कंपनीचा आश्रय असल्यानें बँकेची उभारणी कशी भक्कम पायावर आहे हें सांगितलें व त्याचबरोबर या बँकेच्या सेव्हिंग खात्यास २½ टक्के व एक वर्ष आणि तीन वर्षें मुदतीच्या ठेवीस अनुक्रमें २॥ व ३ टक्के व्याजाचा दर अस-ल्याचें सांगितलें. जमलेल्या लोकांनी बँकेवर विश्वास प्रकट करून बरीच नवीन खातीं सुरू केलीं.

श्रीयुत भाऊसाहेब पाटणकर यांनीं नाशिकास बँकेची आव-श्यकता कशी आहे, या धंद्यास नाशकास बराच वाव कसा आहे आणि त्या योगें नाशिकच्या जनतेची कशी सोय होईल हें सांगितलें. त्यानंतर श्री. देवळालकर वकील यांनीं अध्यक्षांचे व जमलेल्या पाहुण्यांचे आभार मानले व नंतर पानसुपारी होऊन समारंभ योग्य रीतीनें पार पडला.

---

## एक व्यावहारिक राष्ट्रीय सूचना

### ( सचित्र हिंदुस्थान )

हिंदुस्थानांत आजपर्यंत ३६५ जगप्रसिद्ध माणसें खास होऊन गेलेलीं आहेत. त्यांचा एकत्रित संग्रह ( अलबम ) असा आजपर्यंत कोठेंही नाहीं. अशा जगप्रसिद्ध व्यक्तींचा अलबम 'सचित्र हिंदुस्थान' करणें हें एक राष्ट्रीय काम आहे यांत शंकाच नाहीं. वर्षाचे दिवस ३६५ आहेत. प्रत्येक दिवशीं एक आदर्श व्यक्ती आपणासमोर असणें आवश्यक आहे. म्हणून ३६५ विभूतींचा अलबम करण्याचें ठरविलें आहे. दुसरा हेतु असा आहे कीं, लहान मुलें गोष्टी सांगा असा हट्ट मोठ्या माणसाजवळ धरून बसतात. आतां चिमण्या—कावळ्यांच्या गोष्टी सांगण्याचे दिवस नाहींत. आपल्या देशांत जगप्रसिद्ध होऊन गेलेल्या विभूतींच्या गोष्टी आतां वडील मंडळींनीं सांगितल्या पाहिजेत. लहानपणापासूनच आपण विद्यार्थ्यांना राष्ट्रीय गोष्टी सांगण्याची संवय लावावी. थोडक्यांत लिहावयाचें म्हणजे ३६५ चित्रांचा अलबम म्हणजे ३६५ सचित्र राष्ट्रीय गोष्टी होत. हा अलबम विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षेंत पास झाल्या-बद्दल देण्याची तजवीज करण्यांत येईल. या अलबमची उपयु-क्तता किती आहे हें सांगण्याचें कारणच नाहीं. असा अलबम विद्यार्थ्यांचे हातीं देणें हें एक राष्ट्रीय शिक्षणच आहे. चारशे व्यापाऱ्यांनीं जर सहकाय करण्याचें एक साल मनांत आणलें तर अलबम एक वर्षांत तयार होईल. व्यापाऱ्यांनीं एकच साइजचा जाड गुळगुळीत कागद वापरावा. चित्रांचा साइज १०×१४ असा असावा. म्हणजे कॅलेंडरें एकसारखीं दिसावींत व फ्रेम करण्यास सोईचीं व्हावींत हा हेतू. कॅलेंडरावर प्रमुख हिंदी विभूतींचीं चित्रें उत्तम चित्रकारांकडूनच काढविण्यांत यावींत.

**मामा दीक्षित.**

**११२ शनवार पेठ, पुणें २.**


पूर्वींची कर्जयोजना चालू असून शिवाय कर्जखातें नं. २ नें

**द. म. द. शें. ८४चार आणे व्याजानें**

**व**

**अनुक्रमानें रु. १०० ते २०००**

देण्याची नवीन योजना. **लवकर अर्ज करा; लवकर कर्ज मिळवा.** त्वरा करा आणि प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठी ०२ आण्याचीं तिकिटें पाठवा अगर समक्ष भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

**हेड ऑफिसः**-गिरगांव, मुंबई. **ब्रँचः**-लक्ष्मी रोड, पुणें नं. २

---

**फर्म. कंपनी आणि सोसायटी**

यांचा प्रचलित कायदा काय आहे यासंबंधीं सातारचे प्रसिद्ध कायदानिपुण वकील श्री. के. वा. गजेंद्रगडकर यांनीं लिहिलेली लेखमाला "**न्यायबोध**" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः सुरू आहे. त्याचप्रमाणें मुंबई हायकोर्टाचे निवाडे व वेळोवेळीं होणारे प्रान्तिक कायदे प्रत्येक अंकांत प्रसिद्ध होतात. फर्म, कंपनी आणि सोसायटी यासंबंधीं येत असलेली श्री. गजेंद्रगडकर यांची लेखमाला मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून अस-ल्यामुळें हें मासिक अवश्य संग्रहीं ठेवा. वा.व ट.ख. सह फक्त ५ रु; नमुना अंकासाठी सात आण्यांचीं तिकीटें पाठवा.

मॅनेजर,

**"न्यायबोध" मासिक, नागपूर शहर.**

---




**स्त्रियांचा आजार**

म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगां-वर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** ( डि. नं. ६ )

२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

---

**व्ही. व्ही. ॲन्ड को०**

जंपर स्पेशालिस्ट

**लेडीज ॲन्ड जेन्टस टेलर्स,**

८ निहाल पेठ (मुदलीयार रोड), पुणें शहर

### सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

वरील बँकेच्या स्थापनेपासून ता. ३०-६-३८ पर्यंत तिचेकडे ६ लक्ष, ९२ हजार रुपयांच्या कर्जमागणीचे ४०१ अर्ज आले, त्यांपैकीं बँकेच्या बोर्डानें २ लक्ष, ३८ हजारांचे १७८ अर्ज शिफारस करून प्रांतिक लँड मार्गेज बँकेकडे पाठवले. प्रांतिक बँकेनें मंजूर केलेल्यापैकी १२० अर्जदारांस १ लक्ष, ४२½ हजार रुपये वाटण्यांत आले. ह्यापैकी ३७½% रकमेचा तारण गहाणावरील कर्जे फेडण्यासाठी, १५½% रकमेचा सोसायट्यांचीं कर्जे फेडण्यासाठी आणि १५% रकमेचा कबजे गहाणावरील कर्जाच्या फेडीकरतां विनियोग करण्यांत आला. जमीन खरेदीकरितां आणि जमीन सुधारणेकरितां ७½% रकम उपयोगांत आणली गेली. " ही बँक जरी सर्व जिल्ह्याकरितां आहे, तरी पण तिचा फायदा जेथें पाऊस भरपूर आहे, बागायत आहे, असें दुष्काळी नसलेलें भागांसच आहे, असें दिसून येईल. " अहवालाचे वर्षी १ लक्ष, १ हजार रुपये कर्जाची तडजोड ८५½ हजारांत करण्यांत येऊन शेतकऱ्यांस १५½ हजारांची सूट मिळाली आहे. साल अखेर बँकेनें प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेचें देणें १ लक्ष, ३ हजार रुपये आहे. अहवालाचे वर्षी बँकेस २,३७३ रुपये नफा झाला, त्यांतून गेल्या दोन वर्षांतील तोटा १,३३३ रुपये वजा जाता निव्वळ नफा १,०४० रुपये उतरतो. वरील वृत्तांतावरून बँकेच्या प्रगतिपर कार्याची कल्पना येईल.

---

### मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूट

#### मे, १९३८ मधील परीक्षांचे निकाल

(१) कोऑपरेटिव्ह सेक्रेटरीज [ १०३ पैकीं २० उत्तीर्ण ]
(दुसरा वर्ग) न. द. भोळे, ज. मो. त्रिवेदी.

(तिसरा वर्ग) शं. ल. काटभवे, ज. ग. सोमेश्वरकर, द. श्री. सोनवणे, ग. वि. राजगुरु, शं. नि. देवपूरकर, ब. ह. खराडी, शं. खं. माळी, द. नि. पाटील, शं. व. तेली, भा. मो. व्यवहारे, सो. चिं. वाघ, भा. ज. ओशी, न. शा. जोशी, वि. ना. कुलकर्णी, वि. कौ. पाटील, रा. बा. रत्नपारखे, रा. शं. सुतार, दा. न. पटेल.

(२) अर्बन बँक सेक्रेटरीज [ १ पैकीं ० उत्तीर्ण ]
(३) को-ऑपरेटिव्ह सर्टीफिकेट [ ६ पैकीं १ उत्तीर्ण ]
(तिसरा वर्ग) भ. ल. देसाई.

---

### पुणें जिल्हा को. लँड मार्गेज बँक लि.

वरील बँकेच्या बोर्डाचे चेअरमनचे जागीं श्री. बा. सी कामत ह्यांची निवडणूक झाली आहे. रजिस्ट्रारचे प्रतिनिधी म्हणून श्री. शिवराम रामजी पाटील गुंजाळ ह्यांची नेमणूक करण्यांत आली आहे.

---

### जगांतील सायकली

सबंद जगांत मिळून एकूण सुमारें ६ कोटि, १० लक्ष सायकली वापरांत आहेत, असा अंदाज ब्रिटिश सायकल ॲन्ड मोटार सायकल मॅन्युफॅक्चरर्स ॲन्ड ट्रेडर्स यूनियननें प्रसिद्ध केला आहे. सायकलींचे बनावटींत ग्रेट ब्रिटनचा अनुक्रम पहिला लागतो. गेल्या वर्षी त्या देशानें ८½ लक्ष सायकलींची निर्गत केली. इतर सर्व देशांतून झालेल्या एकूण निर्गतीपेक्षा हा आकडा मोठा आहे. सायकल वापरणारांचे संख्येचे दृष्टीनें जर्मनी अग्रेसर आहे. त्या देशांत १½ कोटि सायकली वापरांत आहेत. ग्रेटब्रिटनमध्यें १ कोटि, फ्रान्समध्यें ¾ कोटि, जपानमध्यें ६० लक्ष, इटलीमध्यें ४० लक्ष आणि हॉलंडमध्यें ३० लक्ष सायकली आहेत. अमेरिकेंतील सायकलींची संख्या ५० ते ६० लक्ष भरते; रशियांत फक्त ३½ लक्ष सायकली आहेत. जगांतील कित्येक देशांत सायकलींचा प्रसार होण्यास अद्याप मोठा वाव आहे.

६ टक्के मासिक आंवक ठेव
डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें ठेव ठेवून फायदा मिळवा.
जनरल म्यानेजर–डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

दि गुड-वुइल
ॲशुअरन्स कंपनी लि.
पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल
विमेदारांस
भरपूर सवलती माफक हप्ते
ठिकठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर

सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व वर्फी वापरा
मोती चौक : : : सातारा

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट, मुंबई.

शाखा

| | | |
|---|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | ११ शेवगांव ( जि. अहमदनगर ) | २१ शहादें (जि. प. खानदेश) |
| २ सातारा ( जि. सातारा ) | १२ कोपरगांव ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १३ वाई ( „ ठाणें ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १४ पालघर ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | १५ कल्याण ( „ „ ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी( „ „ ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | १७ विरमगांव ( जि. अहमदाबाद ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | १८ धुळें ( जि. प. खानदेश ) | २८ कळवण ( „ „ ) |
| ९ भिवंडी ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १० अहमदनगर ( जि. अहमदनगर ) | २० शिरपूर ( „ „ ) | ३० कालोल ( „ „ ) |

**खेळतें भांडवल रु. २,००,००,००० चे वर**

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरतां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल. मेहता,

मॅनेजिंग डायरेक्टर.

तृतीय मूल्यमापन चालू आहे.

आपल्या प्रेमीजनांची

# प्रत्येक दिवाळी

आनंदानें व उत्साहानें साजरी होण्याची खात्री,

म्हणजेच

# कॉमनवेल्थ

## ॲशुअरन्स कंपनी लिमिटेड

या कंपनीची पॉलिसी होय.

या व इतर अनेक गुणांमुळेंच या कंपनीनें थोडक्याच काळांत अभूतपूर्व यश संपादन केलें आहे.

**आमचीं अशीं कांहीं वैशिष्ट्यें**

- आधुनिक व आकर्षक विमायोजना
- माफक हते
- काटकसरीचा कारभार
- वाढता नफा
- सहानुभूतीची वागणूक.

इतरत्र विमा उतरण्यापूर्वीं अगर एजन्सी घेण्यापूर्वीं

**प्रथम आमच्याकडे चौकशी करा.**

हेड ऑफिसः—

११ बुधवार पेठ, पुणें.

रा. न. अभ्यंकर,

मॅनेजिंग एजन्ट.

शाखा व उपशाखाः—मुंबई, मद्रास, कलकत्ता, दिल्ली, अहमदाबाद, नाशिक, अहमदनगर, सोलापूर, कराची वगैरे.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजंट सढळ अटींवर नेमणें आहेत.



हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यात रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें